। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २२७ वा । शुक्रवार दिनांक २१ नोव्हेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

Email-dainiklatursamachar@gmail.com

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## विषमुक्त शेती करणे हेच देशाचे मिशन : राज्यपाल आचार्य देवव्रत

**पुणे/प्रतिनिधी** : विषमुक्त शेती करणे हेच देशाचे मिशन असून नैसर्गिक व सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांकडून प्रेरणा घेऊन जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीकडे वळावे, असे आवाहन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या २१ व्या हप्त्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तामिळनाडू राज्यातील कोईम्बतूर येथून ऑनलाइन पद्धतीने वितरण झाले. या कार्यक्रमास कृषी महाविद्यालय पुणे येथून दूरदृष्य प्रणालीद्वारे राज्यपाल आचार्य देवव्रत उपस्थित होते. यावेळी कृषी विभागाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात शेतकऱ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. कार्यक्रमाला कृषी विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी, राज्यपाल यांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, कृषी आयुक्त सूरज मांढरे, राज्यपाल यांचे उप सचिव राममूर्ती आदी उपस्थित होते.



राज्यपाल श्री. देवव्रत म्हणाले, राज्यात काही शेतकरी नैसर्गिक व सेंद्रिय शेती करुन स्वत:च नवनवीन शोध लावत आहेत. एकप्रकारे ते शास्त्रज्ञाचे काम करीत आहेत. त्यांचा शोध इतरांना मार्गदर्शक आहे. अति प्रमाणात रसायने फवारल्याने रोपांचे नुकसान होते. नैसर्गिक घटकांपासून तयार केलेले द्रव्य अग्नीअस्त्र व निमास्त्राचा आलटून- पालटून फवारणी केल्यास शेतामध्ये कधीही निमॅटोडची समस्या राहणार नाही.

राज्यपाल देवव्रत यांनी शेतीविषयी आपले अनुभव कथन करून पिकांचे संरक्षण आणि उत्पादन वाढविण्यासाठी नैसर्गिक शेती पद्धतीविषयी माहिती दिली.

यावेळी आयुक्त श्री.मांढरे यांनी 'पी एम किसान सन्मान निधी' योजनेसंदर्भात माहिती दिली. ते म्हणाले राज्यातील लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात २१ व्या हप्त्यापोटी १ हजार ८०८ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. योजनेच्या निकषानुसार सर्व पात्र शेतकरी कुटुंबास रुपये २ हजार प्रती हप्ता याप्रमाणे तीन समान हप्त्यात दरवर्षी एकूण ६ हजार रुपये जमा करण्यात येतात. आत्तापर्यंत ३६ हजार कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी राज्यपाल श्री. देवव्रत यांच्या हस्ते जिल्ह्यातील नैसर्गिक शेती करणाऱ्या मंगेश भास्कर, दत्तात्रय निगडे, रामदास लांडगे, अनिल पायगुडे व लहू फाले या शेतकऱ्यांचा प्रातिनिधिक स्वरुपात सत्कार करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीतील अनुभव सांगितले.

## मुख्यमंत्री सचिवालयातील कर्मचारी राजेंद्र शिंदे यांना श्रद्धांजली

**मुंबई/प्रतिनिधी** : मुख्यमंत्री सचिवालयातील कर्मचारी राजेंद्र शिंदे यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोक संवेदना व्यक्त करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. तर मुख्यमंत्री सचिवालयातील अधिकारी-कर्मचारी यांनीही दिवंगत शिंदे यांना श्रद्धांजली अर्पण केली.

मुख्यमंत्री सचिवालयातील कर्मचारी राजेंद्र शिंदे यांचे बुधवारी (दि.१९) हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मुख्यमंत्री सचिवालयात मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त मुख्य सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्यासह उपस्थित अधिकारी-कर्मचारी आदींनी श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या कुटुंबाप्रती संवेदना व्यक्त करत, या कठीण प्रसंगी संपूर्ण सचिवालय शिंदे कुटुंबाच्या पाठिशी असल्याची भावना व्यक्त केली.

## युवकांमध्ये प्रचंड क्षमता : जिल्ह्याचा नावलौकिक करा ; जिल्हाधिकारी पुजार यांचे आवाहन

धाराशिव दि.२० नोव्हेंबर (जिमाका) जिल्ह्यातील युवकांमध्ये प्रचंड क्षमता आहे.स्पर्धांमध्ये उत्कृष्टता साधून राज्य आणि देशपातळीवर जिल्ह्याचे नाव उज्वल करा.प्रत्येक कलाप्रकार हा आपल्या व्यक्तिमत्त्व विकासाचा मार्ग आहे.आत्मविश्वासाने मंचावर उतरा आणि तुमचे उत्तम कौशल्य जगासमोर मांडा. असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय,पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तर युवा महोत्सव २०२५ = २०२६ ची पुष्पक मंगल कार्यालय,धाराशिव येथे आज २० नोव्हेंबर २०२५ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली. महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दीपप्रज्वलन करून केले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा नियोजन अधिकारी श्री.पुंडलिक गोडसे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री.नागेश मापारी,जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे,जिल्हा युवा अधिकारी श्री.राहुल डोंगरे व तुळजापूर येथील तुळजाभवानी अभियंत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.ओमप्रकाश रांजणकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

जिल्हा युवा महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत समूह लोकगीत,समूह लोकनृत्य,चित्रकला,कथा लेखन,कविता लेखन,वक्तृत्व अशा विविध कलाप्रकारांसोबतच कौशल्य विकास व नवोपक्रम (विज्ञान प्रदर्शन) यांनाही विशेष स्थान देण्यात आले आहे.विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात एकूण ३५ प्रकल्प सादर झाले असून त्यातून जिल्हा पातळीचा संघ निवडून विभागीय स्पर्धेत सहभागी होणार आहे. प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र तज्ज्ञ परीक्षक नियुक्त करण्यात आले आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.गणेश पवार,तालुका क्रीडा अधिकारी यांनी केले.प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.श्रीकांत हरनाळे यांनी केले. श्री.भैरवनाथ नाईकवाडी,तालुका क्रीडा अधिकारी,श्री.अक्षय बिरादार,क्रीडा अधिकारी,श्री.राजेश बिलकुले,श्री सुनील घोगरे,श्री.किशोर भोकरे,श्री नितिन आडसकर,श्री सुरेश कळमकर व श्री.व्यंकटेश दंडे आदी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महत्वपूर्ण सहकार्य करत आहे.

### प्रत्येकाने आपले नेते व पदाधिकारी सांभाळावेत; अमित शहांची एकनाथ शिंदे यांना सूचना

**मुंबई/प्रतिनिधी** : भाजपकडे बोट दाखविण्यापेक्षा शिवसेनेने आपले नेते व पदाधिकारी सांभाळावेत, ते अन्य पक्षात जाणार नाहीत, याची काळजी घ्यावी, अशी सूचना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केल्याचे सूत्रांनी सांगितले. महायुतीतील मतभेदांवर चर्चा व समन्वयातून मार्ग काढावा, मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार टाकून जाहीरपणे नाराजीचे प्रदर्शन न करण्याची सूचनाही शहांनी शिंदे यांना केली.

## निवडणूक काळात शांतता कायम राहावी याची दक्षता घ्या ; जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार

धाराशिव दि.२० नोव्हेंबर (जिमाका) नगर परिषद व नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी येत्या २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे.निवडणूकीच्या काळात जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहून शांतता कायम राहावी याची दक्षता घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांनी दिले.

२० नोव्हेंबर रोजी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक - २०२५ च्या अनुषंगाने जिल्हास्तरीय निवडणूक संनियंत्रण समितीची सभा जिल्हाधिकारी श्री.पूजार यांच्या अध्यक्षतेखाली त्याच्या कक्षात घेण्यात आली,त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,नगरपरिषद प्रशासन विभागाचे सहआयुक्त त्रिंबक ढेगळे,जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक श्री.चिन्मय दास,राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक श्री.हर्षवर्धन शिंदे,सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता श्री.एन.व्हि.भंडे,पोलीस उपअधीक्षक (गृह) डी.बी.पारेकर, जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे,सहायक राज्यकर आयुक्त प्रदीप चव्हाण,वीज वितरण कंपनीच्या कार्यकारी अभियंता श्रीमती एन.एम.कुलकर्णी व सहायक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत साळी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

श्री.पूजार म्हणाले की,पोलीसांनी निवडणूक काळात अर्लट मोडवर काम करावे.नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी विशेष दक्षता घ्यावी.निवडणूक काळात रोख रक्कमांच्या व्यवहारावर तसेच पैशाच्या देवाण -घेवाणीवर लक्ष दयावे.या निवडणूकीत मोठया प्रमाणात मतदान व्हावे यासाठी व्यापक प्रमाणात मतदार जनजागृती करावी.निवडणूक काळात दारू व पैशाचा वापर मतदाराला प्रलोभनासाठी होणार नाही यासाठी पैसा व दारूच्या जप्तीची कारवाई करावी असे त्यांनी सांगितले.




### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



संसद आमचा निर्णय टाळू शकत नाही - सुप्रीम कोर्ट

## उसाचे क्षेत्र अज्ञात व्यक्तीने जाळुन केले नुकसान

परंडा (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत फर्यादी अभिजीत पोपटराव पाटील, वय ४३ वर्षे, रा. रोसा ता. परंडा जि. धाराशिव यांचे रोसा शिवारातील शेत सर्वे नं ७४ (१) मधील फिर्यादी व आजुबाजूचे असणारे लोकांचे १४ एकर उसाचे क्षेत्र अज्ञात व्यक्तीने जाळुन अंदाजे चार लाख रुपयाचे नुकसान केले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- अभिजीत पाटील यांनी दि.१९.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे परंडा येथे गुन्हा नोंदवला आहे.

### चिमटा

दयाचा



लातूर पोलिसांच्या कारवाईमुळे गुन्हा करणाऱ्याच्या मनात धडकी भरली आहे ! कारवाईत सातत्य असण्याची गरज आहे!

## जिल्हाधिकारी कार्यालय येथे इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



**धाराशिव/प्रतिनिधी**: देशाच्या माजी पंतप्रधान स्व.इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित कार्यक्रमात त्यांच्या प्रतिमेस जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले

.यावेळी अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, उपजिल्हाधिकारी श्रीमती.स्वाती शेंडे, तहसीलदार (महसूल) प्रकाश व्हटकर, दत्तात्रय गायकवाड,नायब तहसीलदार संतोष पाटील व माणिक बेजगमवार यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी सुद्धा इंदिरा गांधींच्या प्रतिमेस अभिवादन केले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## दहशतवादाविरोधात भारताने एकट्याने लढावे लागेल

दिल्लीच्या घटनेवरून भारताला यापुढेही सतर्क राहावे लागणार आहे. काही झाले तरी देशात वाईट प्रवृत्तीच्या लोकांचा शोध घेऊन त्यांच्या बाबतीत कठोर निर्णयाची गरज आहे. मुळात भारतीयांचे नशीब चांगले म्हणून मोठे कटकारस्थान उघडे पडले. ते जर उघडे पडले नसते तर देशात मोठा अनर्थ घडला असता. हिंसा कधीही वाईट आहे. हिंसा करणाऱ्याचा शेवट वाईट आहे हे जरी सत्य असले तरी तो पर्यंत मोठे नुकसान सहन करावे लागते. हिंसाचार घडविला जातो ही एक मानसिकता आहे ती द्वेश भावनेतून घडविली जात आहे. दहशतवादी हे पाकिस्तानी आहेत. दहशतवाद कोण माजवित आहे हे भारतालाच काय जगाला माहिती आहे. अशा स्थितीत जग काही करणार नाही तर या बाबतीत भारतालाच लढावे लागणार आहे. भारतालाच तोंड द्यावे लागणार आहे. भारताला सर्वाधिक झळ बसली आहे ती सहन करीत आला आहे. देशात यापुर्वीचे संपुआच्या सरकारने धाडसी निर्णय घेतले नाहीत त्याचा परिणाम या रालोआला भोगावा लागत आहे. देशात किती जवान शहीद झाले याचा आकडा जाहीर तर विचार करायाला लागल्याशिवाय दुसरा पर्याय नाही. वास्तविक हिंसाचार घडविणारे ठराविक आहे. मोठा समुह नाही. देश स्वतंत्र झाल्यापासून ही समस्या आहे. ज्या दिवशी देशाला स्वातंत्र्य मिळाले त्या दिवसापासून हिंसाचाराला भारताला तोंड द्यावे लागत आहे. दिल्ली सारखी घटना देशात पहिल्यांदा घडली आहे असे नाही. यापुर्वीही अशा घटना घडल्या आहेत. अशा घटना घडल्यानंतर ठोस उपायोजना कोणत्याही सरकारने केली नाही. तशास तसे उत्तर दिले नाही. सिंदुर मोहिम राबविली म्हणजे दहशतवादी संपला असे नाही. याचे पाळेमुळे ठेचण्याची गरज आहे. त्याच प्रमाणे देशात आतंगवाद्याचे नेटवर्क मजबुत आहे हे अनेक बाबीवरून कळून आले आहे. त्यामुळे भारताने यापुढेही सतत कृतीत काही करण्याची गरज आहे. देशात दहशतवादी जे भारताविरोधी कारवाया करीत आहेत त्यांचे मुळे नेटवर्क शोधून ती नष्ट केली पाहीजेत. काही शैक्षणिक संस्थेचा यात सहभाग असेल तर त्याला पायबंद घातला पाहिजे. केवळ धमक्या किंवा पुळचट धोरण सोडून दिले पाहिजे. जशास तसे उत्तर देत नाही. अतिरेक्यांनी दहा भारतीयांची हत्या केली या बदल्यात दोन अतिरेकी मारले गेले ही शोभनिय बाब नाही. केवळ बोलणे सोडून अतिरेक्याविरोधात कामाची गरज आहे. पहलगाममध्ये जी घटना घडली ही सहज घडली नाही. यामागील स्थानिकांचा किती सहभाग होता हे तपासले जात नाही. दिल्लीत घटना घडली यात भारतीय किती सामिल आहेत. त्यांच्या विचाराचे किती आहेत याचा कधी विचार केला का? देशात दहशतवादी कारवाया गडद होत आहेत. आता बंदुकीने किंवा तलवारीने युद्ध किंवा सामना करण्याचे दिवस संपले आता अणुयुद्धापेक्षा भयाण रासायनिक युद्ध खेळले जाते. हे दिल्लीत सापडलेल्या कारवायावरून दिसून येते. त्याने बनविलेले रसायन, स्फोटाची क्षमता ही मतीमंद करणारी आहे. एवढे शिकलेली मंडळी भारताला विध्वंस करण्याच्या तयारीत आहे. अशिक्षित किंवा आडणी मंडळी पेक्षा शिकलेली डॉक्टरमंडळीचे भयानक स्वरूप चिंताजनक आहे हे भारतीयांच्या लक्षात येत नाही. अजूनही वेळ गेलेली नाही. भारतीयांनी मनावर घेतले व काही कठोर निर्णयाची अमलबजावणी केली तर अतिरेक्यांना भारतीय भुमित पाय ठेऊ देणार नाहीत. केवळ हिंसा घडविणे हाच अजेंठा चालू आहे. त्यामुळे भारतीयांनी वेळीच सावध झाले पाहिजे. भारतीयांनी पाकिस्तानची चाल ओळखली पाहिजे. देशातील ठराविक मंडळी पाकिस्तानी धार्जिनी किती आहे याचा शोध घेतला पाहिजे. दिल्लीतील घटना व सापडलेल्या बाबीवरून पाहिले तर भारतीयांची झोप उडाली पाहिजे. असे काम केले आहे. डॉक्टर मंडळी ही जीवनदान देणारी आहे. ईश्वरीय स्थान जनता देते. जीव घेण्यासाठी हा त्यांचा पेशा नाही. असे असताना केवळ हिंसा घडविली जात असेल तर भारतीय पेटून उठले पाहिजे. भारतीय मंडळी ही थंड रक्ताची आहे. केवळ वीर पुरुषांचे वंशज म्हणावयाचे व कोणतेही धाडसी काम करावयाचे नाही हे योग्य नाही. हिंसाचाराचा उगम कोठून आहे. हिंसाचार कोठून पैदा होत आहे. त्याचा समुळ उच्चाटन केले पाहिजे. सत्तर-पंच्याहत्तर वर्षा पासून लढतो आहे. तरी दहशतवाद वाढता आहे. कमी नाही. रालोआचे सरकार आल्याने अप्रिय घटना कमी झाल्या आहेत मात्र याला जनतेची साथ ज्या प्रमाणात मिळावयास पाहिजे ती दिसून येत नाही. देशात अनेक समाजाची मंडळी राहाते. अनेक धार्मिक, जात व पंथाची मंडळी राहाते. असे असले तरी ठराविकांचा दहशतवाद हा वाढता आहे या बाबीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. ठोस भुमिका घेण्याची गरज आहे. केंद्रातील पुर्वीच्या सरकारने ज्या चुका केल्या त्याची पुर्नरावृत्ती होऊ नये. अतिरेकी कारवायामुळे मने दुभागली जात आहेत. सर्वच वाईट आहेत असे नाहीत. काही मंडळी चांगली आहे. ब्रेनवॉश केल्यामुळे वाईटाकडे वळलेल्या मंडळींना रस्त्यावर आणणे आवश्यक आहे. भारतीयांनी आता ठोस निर्णय घेण्याची गरज आहे. काही झाले तरी आतंगवाद हा देशाला लागलेली किड आहे. त्यामुळे तो कसा संपेल यासाठी भारतीयांनी सरकारला मदत केली पाहिजे. देशात त्यांच्या कारवायाकडे लक्ष ठेवुन आपल्या परिने सरकारला मदत कशा प्रकारे करता येईल याचा विचार करावा लागेल. देशात आता एक शिक्षण प्रणालीची आवश्यकता आहे. इतर भाषेच्या शिक्षणाला परवानगी देवु नये. जो पर्यंत राष्ट्रीय विचाराची शिक्षण पद्धती स्विकारणार नाही तो पर्यंत आतंगवाद हा पोसला जाणार आहे. याचे पाळेमुळे शोधली पाहिजेत. त्यावरच घाला घातला पाहिजे. बऱ्याच वेळी स्वार्थापोटी देशहीत विसरले जात आहे ते होता कामा नये. नसता एक ना एकस जुना काळ भोगावा लागणार आहे. आजही काही बाबतीत सखोल विचाराची गरज आहे. काही बाबतीत कठोर निर्णयाची गरज आहे. त्यामुळे देशातील नागरिकांनी विचार करून वाटचालीची गरज आहे. दिल्लीतील घटना ही आगामी काळात मोठ्या विध्वंसकाची चाहूल आहे, पुर्वसूचना आहे. त्यामुळे वेळीच रोखणे ही भारतीयांची मोठी जबाबदारी आहे.

# नमस्कार : मानवी नात्यांना जोडणारी सामाजिक शक्ती

'नमस्कार' हा शब्द उच्चारताच मनात एक उबदार भावना निर्माण होते. समोरच्या व्यक्तीला मान देणे, त्याच्याशी संवादाची पहिली पायरी टाकणे, आणि सामाजिक नात्यांची विण घट्ट करण्याची प्रक्रिया याची सुरुवात या छोट्याशा शब्दातून होते. म्हणूनच २१ नोव्हेंबर हा दिवस 'जागतिक नमस्कार दिन' ( ) म्हणून जगभर पाळला जातो. १९७३ मध्ये इजिप्त आणि इस्रायल दरम्यान झालेल्या युद्धानंतर शांततेचा संदेश देण्यासाठी या दिवसाची निर्मिती झाली. आज ज व ळ ज व ळ १८० हून अधिक देश हा दिवस पाळतात. नमस्कार हा केवळ अभिवादनाचा शब्द नाही; तो सामाजिक व्यवहारातील सभ्यता, नम्रता आणि परस्पर आदराचे प्रतिक आहे. समाजशास्त्राच्या दृष्टीने पाहिल्यास 'नमस्कार' म्हणजे मानवसंस्कृतीचा मूलभूत पाया होय. मानवी संबंध, सामाजिक भांडवल , सांस्कृतिक मूल्ये आणि शांततामय सहजीवनाची तत्त्वे यांची सांगड 'नमस्कार' या एका छोट्याशा कृतीतून दिसून येते.



आजच्या जागतिकीकरणाच्या युगात, संवादाच्या असंख्य साधनांची उपलब्धता असली तरी मानवी नात्यांतील उब, आदर आणि संवेदनशीलतेचे स्थान धोक्यात येताना दिसते. व्हर्च्युअल संवाद वाढल्याने 'हॅलो', 'हाय' अशी इंग्रजी स्वरूपातील अभिवादने प्रचलित झाली, परंतु भारतीय 'नमस्कार' या संकल्पनेतील सांस्कृतिक खोली आजही अधिक प्रभावी आहे. भारतीय समाजात अभिवादन हा एक संस्कार मानला जातो. वडीलधाऱ्यांना वंदन करणे, पाहुण्यांचे स्वागत करणे, रस्त्यावर भेटलेल्या व्यक्तीला नम्रपणे 'नमस्कार' म्हणणे ही कृती मनातील आदर जागवते. एखाद्या व्यक्तीला केलेला नमस्कार म्हणजे त्याच्या अस्तित्वाची पावती होय. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता 'नमस्कार' ही सामाजिक सलोखा, स्नेहभाव, समुदायभावना आणि नागरिकांमधील विश्वास वाढवणारी कृती आहे.

आजचा काळ तंत्रज्ञानाने अवकाश कवेत घेतलेला काळ आहे. पण त्याच वेळी व्यक्तिगत एकाकीपण, तणाव, भीती, मानसिक आरोग्याशी संबंधित संकटे वाढत आहेत. मानसशास्त्र सांगते की सर्वात छोटा सामाजिक संकेत जसे की स्मित, अभिवादन, नमस्कार ही कृती व्यक्तीला सामाजिक अस्तित्वाची जाण करून देते, आत्मविश्वास वाढवते आणि सकारात्मक ऊर्जा देते. म्हणून 'नमस्कार' ही संस्कृती केवळ आदराची खूण नसून मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही महत्त्वाची आहे. एखाद्या अनोळखी व्यक्तीलाही नमस्कार केल्यावर तो क्षण एक प्रकारची सुरक्षितता निर्माण करतो. अनोळखी लोकांमधील संवादाची सुरुवात तणाव कमी करते आणि सामाजिक विश्वास वाढवते. म्हणूनच सार्वजनिक ठिकाणी, शाळा-कॉलेजमध्ये, शासकीय कार्यालयांत किंवा गावपातळीवरील सामूहिक जगामध्ये अभिवादन संस्कृती वाढवणे म्हणजे सामाजिक सकारात्मकतेचा पाया मजबूत करणे होय.

समाजशास्त्रामध्ये अभिवादनाला 'प्रतीकात्मक आंतरक्रीयावाद' याच्या मुळाशी सामावलेले मानले जाते. प्रत्येक व्यक्ती स्वतः बद्दल आणि इतरांबद्दलची धारणा निर्माण करताना या प्रतीकात्मक कृतींचा आधार घेतो. 'नमस्कार' हा केवळ हात जोडणे किंवा शब्द उच्चारणे नाही; तो आपल्या संस्कारांचे, मूल्यांचे आणि सामाजिक ओळखीचे प्रतीक आहे. एका व्यक्तीचा नमस्कार दुसऱ्यात आदर, स्वीकार आणि सुरक्षिततेची भावना निर्माण करतो. यामुळे सामाजिक नातेसंबंध दृढ होतात. परिणामी समाजातील तणाव घटतो, स्पर्धा आणि संघर्षाच्या वातावरणात मानवी संवेदना टिकून राहतात.

जागतिक नमस्कार दिनाचा मुख्य संदेश हा जगातील शांतता, सौहार्द, संवाद आणि सामोपचार टिकवण्याचा आहे. आज जेव्हा देशांमध्ये राजकीय तणाव, सांस्कृतिक संघर्ष, धार्मिक मतभेद, हिंसा आणि डिजिटल दरी वाढत आहे, तेव्हा 'हॅलो' किंवा 'नमस्कार' हा शब्द छोटा असला तरी त्यामागील विचार मोठा आहे, तो म्हणजे संवादाद्वारे तणाव कमी करणं. इतिहास सांगतो की युद्ध, संघर्ष आणि कटुता हे गैरसमजातून वाढतात. संवादाची पहिली पायरी म्हणजे अभिवादन होय. त्यामुळे जागतिक नमस्कार दिन हा शांततेच्या प्रक्रियेतील एक प्रतीकात्मक पाऊल आहे.

भारतीय समाजात 'नमस्कार' दिन साजरा करण्याचे सामाजिक महत्त्व अधिक व्यापक आहे. नमस्कार म्हणजे संस्कृती टिकवण्याचा मार्ग आणि सामाजिक भांडवल वाढवण्याचे साधन आहे. आधीच्या पिढ्या सकाळी उठल्याक्षणी घरातील ज्येष्ठांना नमस्कार करून दिवसाची सुरुवात करायच्या. आजच्या पिढीत हे बंधन शिथिल झाले, परंतु अभिवादन संस्कृतीचे मूल्य आज अधिकाधिक महत्त्वाचे आहे. समाज माध्यमांवरील आभासी जगात 'हाय', 'हॅलो', 'गुड मॉर्निंग'चे संदेश हजारो मिळतात, पण प्रत्यक्ष आयुष्यातील नमस्कार देणारा जवळचा माणूस नसल्यास त्या संबंधांचा उबदारपणा टिकत नाही.

याच अनुषंगाने, या दिवशी शाळा-महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना अभिवादनाचे महत्त्व शिकवणे आवश्यक आहे. वर्गात प्रवेश करताना शिक्षकाला नमस्कार करणे, मित्रांना अभिवादन करणे, एकमेकांचा आदर राखणे, ही छोटी कृती मुलांमध्ये सामाजिक कौशल्ये विकसित करते. आजची युवा पिढी तंत्रज्ञानात प्रचंड वेगाने प्रगती करत असली तरी सामाजिक कौशल्यांमध्ये घट जाणवते. मूलभूत संवादकौशल्य, सौजन्य, विनम्रता व परस्पर आदर या मूल्यांत सातत्य ठेवणे आवश्यक आहे. नमस्कार हा केवळ परंपरा नाही, तर सामाजिक भावनिक शिक्षणाचा मूलाधार आहे.

याहूनही महत्त्वाचे म्हणजे विविधतेने नटलेल्या भारतीय समाजात 'नमस्कार' ही कृती सर्वांना जोडणारा पूल आहे. भाषा, धर्म, जात, प्रदेश, वंश, आर्थिक विभाजन या सर्व भिंतींच्या पलीकडे 'नमस्कार' हा समान संस्कार आहे. महामार्गावर भेटलेला ट्रकचालक असो, सायकलवर जाणारा शेतकरी असो, उंच इमारतीत राहणारा व्यावसायिक असो किंवा गावातील वृद्ध महिला-पुरुष असो 'नमस्कार' हा शब्द सर्वांना सारखाच उबदार वाटतो. सामाजिक समता आणि परस्पर आदर टिकवण्यास ही कृती महत्त्वाची ठरते.

आजच्या काळात संवादाच्या तुटलेल्या धाग्यांची जुळवाजुळव करणे ही मोठी गरज आहे. कुटुंबांमध्ये पिढ्यांमधील संवाद कमी झाला आहे, समाजात परस्पर अविश्वास वाढतो आहे, सार्वजनिक क्षेत्रात चिडचिड, आक्रमकता आणि असहिष्णुता वाढत आहे. पण या नकारात्मकतेत 'नमस्कार' हा छोटासा शब्द मनातला राग विरघळवतो, नव्या संवादाचे दार उघडतो आणि सामाजिक उबदारपणा निर्माण करतो. मानसशास्त्रीयदृष्ट्या नमस्कार केल्याने हसरा चेहरा आणि नम्र आवाज मेंदूतील सकारात्मक हार्मोन्स सक्रिय करतात. त्यामुळे व्यक्तीचा मूड सुधारतो, तणाव कमी होतो आणि नात्यांमध्ये सौम्यता वाढते.

जागतिक नमस्कार दिन हा केवळ औपचारिक दिन नाही; तो सामाजिक संवेदना, मानवता आणि परस्पर आदराचा उत्सव आहे. वाईट बातम्यांनी भरलेल्या जगात चांगल्या संवादाची, सकारात्मक सामाजिक वर्तणुकीची आणि मानवी मूल्यांची गरज पूर्वीपेक्षा अधिक आहे. खरा संवाद 'नमस्कार'पासूनच सुरू होतो. एखाद्या छोट्या अभिवादनानेही आपण एखाद्याच्या मनात आशेचा दिवा पेटवू शकतो.

आज या दिवसाचे औचित्य साधून आपण आपल्या जीवनात खालील विचार दृढ करणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीला मान द्या, कोणालाही भेटताना अभिवादन करण्याची संस्कृती रुजवा, नात्यांमध्ये संवादाची दारे सतत उघडी ठेवा आणि समाजात सकारात्मकतेचा संदेश पसरवा. जागतिक नमस्कार दिन आपल्याला स्मरण करून देतो की मोठा बदल करण्यासाठी मोठी भाषणे किंवा मोठी कृती आवश्यक नसते; कधी कधी एका साध्या 'नमस्कार'मध्येही मानवतेचे सर्वात मोठे सामर्थ्य दडलेले असते.

म्हणूनच आजच्या या जागतिक नमस्कार दिनी आपण सर्वांनी एकच संकल्प करूया की प्रत्येक दिवशी भेटलेल्या प्रत्येक व्यक्तींना मनापासून अभिवादन करायचे. 'नमस्कार' या शब्दात सामाजिक बंधुभावाचे, संस्कारांचे आणि शांततेचे बीज आहे. या बीजातूनच मानवतेचा वटवृक्ष उभा राहतो. नमस्कार म्हणजे फक्त अभिवादन नाही; तो मनुष्यत्वाचा उत्सव आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. ९९६०१०३५८२**

# काशीलिंगेश्वर नगरात कचऱ्याची समस्या, महानगरपालिकेच्या डेपोमध्ये टाकण्याची परवानगीची मागणी

### महानगरपालिका आयुक्त मानसी मीना यांच्याकडे निवेदनाद्वारे डॉ. विनोद चव्हाण यांनी केली मागणी




**लातूर/प्रतिनिधी** : लातूर शहरानजीकच्या काशीलिंगेश्वर नगर परिसरामध्ये कचऱ्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. परिसरात घंटा गाडी वेळेवर येत नाही. या परिसरामध्ये कचऱ्याचे ढीग जमा होत आहेत. तरी परिसरातील कचरा महानगरपालिकेच्या कचरा डेपोवर टाकण्याची परवानगी महानगरपालिकेच्या वतीने देण्यात यावी अशी मागणी परिसरातील रहिवाशांनी महानगरपालिकेच्या आयुक्त मानसी मीना यांच्याकडे केली आहे. याबाबत प्रा. डॉ. विनोद चव्हाण यांनी बुधवारी सकाळी महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी मीना यांना भेटून या मागणीचे निवेदन दिले.

या निवेदनात म्हटले आहे की, शहराच्या हद्दीलगत अंबाजोगाई रोड भागात काशीलिंगेश्वर नगर आहे. काही वर्षांपूर्वी या भागाची नव्याने ग्रामपंचायत निर्माण झाली आहे. शहरालगत असल्यामुळे ही मोठी वस्ती आहे. दरम्यान, या काशिलिंगेश्वर ग्रामपंचायतवरती प्रशासक असून नागरिकांना अनेक वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या परिसरामध्ये कचऱ्यांची समस्या गंभीर बनत चाललेली असून जागोजागी कचऱ्याचे ढीग जमा होत आहेत. परिणामी परिसरात अस्वच्छता, दुर्गंधी अनेक ठिकाणी पसरत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या परिसरामध्ये कचरा संकलन करणाऱ्या घंटा गाड्यांना परिसरातील रहिवाशी कचरा उचलण्यासाठी पैसे देतात. परंतु हा गोळा केलेला कचरा टाकायचा कुठे असा प्रश्न कचरा गोळा करणाऱ्या घंटागाडी चालकांना पडला आहे. कारण हा परिसर ग्रामपंचायत अंतर्गत येत असल्यामुळे महानगरपालिकेच्या कचरा संकलन केंद्रावरती कचरा टाकू दिला जात नसल्याच्या तक्रारी आहेत. तरी काशीलिंगेश्वर नगर येथील जमा होणारा कचरा महानगरपालिकेच्या कचरा डेपो वरती टाकू देण्याची परवानगी महानगरपालिकेने देण्यात यावी अशी विनंती महानगरपालिका आयुक्तांकडे करण्यात आली आहे.

या परिसरामध्ये स्थानिक आणि इतर ठिकाणचे मिळून जवळपास २२,००० लोकसंख्या आहे. काशीलिंगेश्वर नगरातील कचऱ्याप्रश्नी लातूर महानगरपालिका आयुक्तांना भेटून प्रा. डॉ. विनोद चव्हाण यांनी वस्तुस्थिती मांडली. तरी या विषयाचे गांभिर्य लक्षात घेवून आयुक्त मानसी मीना यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. लवकरच बैठक घेऊन ही समस्या सोडवण्याचे आश्वासन दिले असल्याचे, प्रा. डॉ. विनोद चव्हाण यांनी सांगितले.

# पेरूच्या पानांसोबत स्वयंपाक घरातील 'हे' पदार्थ एकत्र करून खा; डायबिटीजपासून लठ्ठपणा झटपट होईल कमी!

कामाचा ताण आणि धकाधकीची जीवनशैली यामुळे शरीराच्या अनेक समस्या उद्भवतात. अशावेळी बाजारातील औषधांवर अवलंबून न राहता, काही घरगुती आणि आयुर्वेदिक उपाय आजमावणं अत्यंत फायदेशीर ठरतं. आज आम्ही अशाच एका उपायाबाबत सांगणार आहोत. बाजारात मिळणारा पेरू आपण सगळे आवडीनं खातो. पेरूच्या फोडी करुन त्यावर मिठ, मसाला टाकला की, कामच झालं. एकदम भारी. पण अनेकांच्या तोंडाला पाणी आणणाऱ्या पेरूसोबतच पेरूची पानंही आरोग्यदायी ठरतात. त्यातल्या त्यात इतर पदार्थांसोबत एकत्र करुन सेवन केल्यानं पेरूच्या पानांचा फायदा अधिक होतो.



तुम्ही कधी पेरूची पानं आणि आलं एकत्र करून खाल्लंय का नसेल तर एकदा नक्की ट्राय करून पाहा. या दोन्ही पदार्थांचं मिश्रण आरोग्याशी संबंधित अनेक समस्या दूर करतं. पेरूच्या पानांमध्ये पॉलिसेकेराइड, फायबर, व्हिटॅमिन सी, अँटी-हायपरग्लायसेमिक असे गुणधर्म असतात, ज्यामुळे रक्तातील साखरेवर नियंत्रण ठेवता येतं आणि लठ्ठपणा वाढतो. जर आपण आल्याबद्दल बोललो, तर त्यात खूप कमी प्रमाणात कॅलरीज असतात. शिवाय, हे पोषक तत्वांचे भांडार आहे. एवढंच नाही तर पेरूच्या पानांमध्ये व्हिटॅमिन बी आणि सी आढळतं, जे आरोग्याच्या अनेक समस्या दूर करण्यात प्रभावी ठरू शकतं. जर तुम्ही पेरूच्या पानांचा अर्क आणि आलं यांचं नियमित सेवन केलं तर ते आरोग्याच्या अनेक समस्या दूर करण्यात प्रभावी ठरू शकतं. जाणून घेऊयात, पेरूची पानं आणि आलं एकत्र खाण्याचे काय फायदे

पेरूच्या पानांसोबत स्वयंपाक घरातील 'हे' पदार्थ एकत्र करून खा; डायबिटीजपासून लठ्ठपणा झटपट होईल कमी!

बद्धकोष्ठाची समस्या दूर करण्यासाठी

पेरूच्या पानांचा अर्क आणि आल्याचं सेवन केल्यानं बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून आराम मिळतो. आतड्यात जमा झालेल मल मोकळं करून आतड्यांच्या हालचालींच्या समस्यांपासून आराम मिळू शकतो. जर तुम्हाला दीर्घकाळ बद्धकोष्ठतेचा त्रास होत असेल तर पेरूच्या पानांसोबत आल्याचं सेवन नक्की करा.

पेरूच्या पानांसोबत स्वयंपाक घरातील 'हे' पदार्थ एकत्र करून खा; डायबिटीजपासून लठ्ठपणा झटपट होईल कमी!

ब्लड शुगर नियंत्रणात ठेवण्यासाठी

पेरूच्या पानांमध्ये मधुमेहविरोधी गुणधर्म असतात. तसेच, आल्यामध्ये अँटी इंफ्लेमेटरी गुणधर्म देखील भरपूर असतात. या दोन मिश्रणाच्या सेवनानं मधुमेहाची पातळी नियंत्रित ठेवता येते. त्यामुळे रक्तातील साखरेवर नियंत्रण ठेवण्यास मोठ्या प्रमाणात मदत होऊ शकतं.

पेरूच्या पानांसोबत स्वयंपाक घरातील 'हे' पदार्थ एकत्र करून खा; डायबिटीजपासून लठ्ठपणा झटपट होईल कमी!

दातांच्या दुखण्यापासून आराम मिळवण्यासाठी

दातदुखीचा त्रास कमी करण्यासाठी पेरूच्या पानांचा रस आणि आल्याचा रस एकत्र करून कोमट पाण्यासोबत घ्या. याशिवाय हे मिश्रण काही काळ दातांवर लावू शकता. यामुळे वेदना कमी होण्यास मोठ्या प्रमाणात मदत होऊ शकते.

पेरूच्या पानांसोबत स्वयंपाक घरातील 'हे' पदार्थ एकत्र करून खा; डायबिटीजपासून लठ्ठपणा झटपट होईल कमी!

वजन कमी करण्यासाठी फादेशीर

शरीराचं वाढतं वजन नियंत्रित ठेवण्यासाठी पेरूची पानं आणि आलं यांचं मिश्रण खाणं, हा एक आरोग्यदायी पर्याय असू शकतो. यासाठी १ कप पाण्यात पेरूची काही पानं उकळा आणि नंतर त्यात किसलेलं आलं घालून पाणी चांगलं उकळून घ्या. सकाळी या काढ्याचं सेवन केल्यानं तुमच्या शरीराचं वजन झपाट्यानं कमी होऊ शकतं.

घसा खवखवणं

घसादुखीची समस्या कमी करण्यासाठी आलं आणि पेरूच्या पानांचा रस पिणं तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरू शकतं. यामुळे घशातील सूज आणि दुखण्यापासून त्वरित आराम मिळू शकतो.

# आंघोळीनंतरही 'हे' ५ अवयव राहतात अस्वच्छ, अनेक जण करतात दुर्लक्ष; तुम्हाला माहिती आहेत का

आपल्या देशात रोज आंघोळ करणे हा एक विधी आहे. जगातील अनेक देशांमध्ये लोक आठवडाभर आंघोळ करत नाहीत. आपल्या देशाच्या प्रत्येक भागात आंघोळ हा दैनंदिन नित्यक्रमाचा भाग आहे. पण केवळ आंघोळ करणे पुरेसे नाही. त्याऐवजी शरीराची संपूर्ण स्वच्छता आवश्यक आहे. कारण आंघोळ केल्यानंतरही शरीराचे अनेक अवयव घाण राहतात आणि ते व्यवस्थित साफ न केल्याने आजार होऊ शकतात. अशाच ६ अवयवांबद्दल जाणून घेणार आहोत, ज्याची स्वच्छता अतिशय महत्त्वाची आहे.

डोळे

आंघोळ करताना बहुतेक लोक डोळे धुत नाहीत. त्यामुळे डोळ्यांना अनेक प्रकारचे त्रास होऊ लागतात. यापैकी सर्वात सामान्य म्हणजे डोळ्यांना खाज सुटणे आणि संसर्ग होण्याची समस्या. याशिवाय डोळ्यांमध्ये कोरडेपणाची समस्या आहे. डोळे धुण्यासाठी आंघोळ करताना मगमध्ये पाणी घ्या आणि या पाण्याने डोळे स्वच्छ धुवा. किंवा पाण्याने भरलेल्या मगमध्ये डोळा थोडा आत जाईल याची डोळे उघडा आणि आतून बंद करा. पाण्याखाली पाच वेळा एक डोळा उघडा आणि बंद करा.

कानांच्या मागे स्वच्छता

बहुतेक लोक आंघोळ करताना किंवा तोंड धुताना कान स्वच्छ करतात. पण कानामागील भाग अस्वच्छ राहतो. त्यामुळे लोकांना अनेकदा येथे खाज सुटणे किंवा संसर्गाचा त्रास होतो. आंघोळीनंतर कानाचा खालचा भाग सुती कापडाने किंवा टॉवेलने स्वच्छ करा.

नखे

आंघोळ करताना नखे साफ होत नाहीत. परंतु दररोज मॅनिक्युअर करणे शक्य नाही. त्यामुळे रोज अंघोळ करताना जुन्या टूथब्रशच्या साहाय्याने हात आणि पायाची नखे स्वच्छ करा. जेव्हा तुम्ही दररोज हे कराल, तेव्हा तुमचे नखे स्वच्छ करायला एक मिनिटही लागणार नाही.

नाभी

खूप कमी लोक नाभी स्वच्छ करतात. पण नाभीवरील घाण संपूर्ण शरीराच्या आरोग्यावर परिणाम करते. नाभीला तेल लावून निरोगी राहण्याची कृती तुमच्या आजी तुम्हाला शिकवत आहेत. नाभीत तेल लावल्याने शरीराला फायदा होतो, तर त्यात साचलेली घाणही आजारी पडते. नाभी स्वच्छ करण्यासाठी तुम्ही सुती कापड किंवा कानातल्या कळ्या वापरू शकता.

पायाचे तळवे

आंघोळ करताना बहुतेक लोक पायांचे तळवे स्वच्छ करण्याकडे लक्ष देत नाहीत. आंघोळ करताना तुम्ही तुमचे तळवे लाँड्री ब्रशने स्वच्छ करू शकता. अन्यथा, वेळोवेळी पेडीक्योर करत रहा.

# आपल्या लिव्हरच्या आरोग्यासाठी हे यो-गासन नियमित केल्यास ठरले फायद्याचे

आधुनिक जीवनशैली आणि असंतुलित आहारामुळे यकृताशी संबंधित समस्या झपाट्याने वाढत आहेत. निरोगी यकृत राखणे हे एकूण आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. यकृत तंदुरुस्त, सक्रिय आणि विषमुक्त ठेवण्यासाठी काही योगासनांचा तुमच्या दैनंदिन दिनचर्येत समावेश केला पाहिजे.या योगासनांचा नियमित सराव केल्याने लिव्हर निरोगी राहील.चला जाणून घेऊ या.

त्रिकोणासन, धनुरासन, भुजंगासन, अर्ध मत्स्येंद्रासन आणि सलंबा भुजंगासन. या आसनांचा नियमित सराव यकृताचे कार्य सुधारतो, विषारी पदार्थ काढून टाकतो आणि पचनसंस्था मजबूत करतो.

चरीरींहळ

मनोरुग्णालयात मधमाशांच्या हल्ल्यात एकाचा मृत्यू तर अनेक जखमी; नागपूर मधील घटना

ठशरव ीश

ीशलोशपवशव लू

घरी वजन कमी करण्यासाठी प्रभावी योगासने

त्रिकोणासन यकृत आणि पोटाच्या अवयवांवर दबाव टाकून विषाक्तता कमी करण्याच्या प्रक्रियेला गती देते. धनुरासन पोटाची चरबी कमी करण्यास आणि यकृत सक्रिय करण्यास मदत करते. भुजंगासन यकृताची जळजळ कमी करते आणि रक्ताभिसरण वाढवते. अर्ध मत्स्येंद्रासन यकृताचे टॉनिक म्हणून काम करते आणि पाचक रस सक्रिय करते. सलम्बा भुजंगासन यकृत स्वच्छ करते आणि संपूर्ण पोटाच्या भागाला विषाक्तता कमी करते.

एका महिन्यात वजन कमी करण्यासाठी हे योगासन करा

या आसनांचा नियमित सराव केल्याने यकृत निरोगी राहण्यास मदत होते, ऊर्जा वाढते आणि पचनसंस्था मजबूत होते. ते यकृताच्या दीर्घकालीन समस्यांपासून देखील आराम देतात. योगासोबतच, संतुलित आहार आणि पुरेसे पाणी पिणे हे यकृताच्या आरोग्यासाठी देखील आवश्यक आहे. अशाप्रकारे, साधे आणि प्रभावी योगासन यकृताला विषमुक्त करू शकतात आणि ते तंदुरुस्त आणि निरोगी ठेवू शकतात.



# हिवाळ्यात आरोग्याची काळजी घेण्यासाठी...

रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी हिवाळ्यातील पदार्थ: हिवाळ्यात तुमच्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत महत्वाचे आहे, कारण थंडीच्या काळात शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते आणि थंडीमुळे कधीकधी आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात.

हिवाळ्यात स्वतःला निरोगी ठेवण्यासाठी दररोज आवळा खावे, इतर फायदे जाणून घ्या

योग्य आहार घेतल्यास आपण या समस्या टाळू शकतो आणि आपले आरोग्य राखू शकतो. हिवाळ्यात शरीराला जास्त उष्णता आणि उर्जेची आवश्यकता असते, ज्यामुळे सर्दी, खोकला, सांधेदुखी, अशक्तपणा आणि थकवा टाळता येतो.

तुमच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी तुम्ही तुमच्या हिवाळ्यातील आहारात समाविष्ट करू शकता अशा ५ गोष्टी येथे आहेत:

-ङ्डज ठए-ऊ सकाळी लसणाच्या २ पाकळ्या खाल्ल्याने प्रचंड फायदे होतात

१. अक्रोड: अक्रोड हे हिवाळ्यातील सुपरफूड मानले जाते. ओमेगा-३ फॅटी ॲसिडने समृद्ध असलेले हे अक्रोड हृदयाचे आरोग्य राखण्यास मदत करते. हिवाळ्यात शरीर उबदार ठेवण्यास



आणि त्वचेला मॉइश्चरायझेशन देण्यास मदत करते. याव्यतिरिक्त, अक्रोडमध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात जे सर्दी आणि खोकल्यापासून संरक्षण करतात आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात.

कसे खावे: तुम्ही थेट जेवण म्हणून खाऊ शकता.

२. तुळशी आणि आल्याचा चहा: तुळशी आणि आले दोन्ही सर्दी आणि फ्लूशी लढण्यास मदत करतात. आले शरीरात उष्णता निर्माण करते, तर तुळशीची पाने श्वसनमार्ग स्वच्छ करतात. ही चहा हिवाळ्यात शरीराला उबदार ठेवतेच, शिवाय रोगप्रतिकारक शक्ती वाढवते आणि सर्दी आणि खोकला टाळते.

कसे खावे: तुळशीची पाने आणि आले पाण्यात उकळा, त्यात मध घाला आणि ते सेवन करा.

दुधासोबत काय खाऊ नये?

३. गाजर: गाजर हिवाळ्यात सहज उपलब्ध असतात आणि ते जीवनसत्त्वे अ आणि क चे उत्कृष्ट स्रोत आहेत. गाजरांमध्ये फायबर देखील भरपूर असते, जे पचन सुधारते आणि शरीर हलके ठेवते. हिवाळ्यात गाजर खाणे आरोग्यासाठी फायदेशीर आहे, कारण ते त्वचेला हायड्रेट ठेवते आणि शरीराला आतून उबदार करते.

कसे खावे: तुम्ही गाजर कच्चे खाऊ शकता किंवा त्यापासून गाजराचा हलवा बनवू शकता. गाजर सूप देखील एक उत्तम पर्याय आहे.

४. लिंबूवर्गीय फळे: संत्री, गोड लिंबू, टेंजेरिन आणि द्राक्ष यांसारखी फळे व्हिटॅमिन सीने समृद्ध असतात, जी हिवाळ्यात रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. ही फळे शरीराला हायड्रेट ठेवतात आणि सर्दी आणि खोकला सारख्या समस्या टाळतात. शिवाय, या फळांमधील अँटीऑक्सिडंट्स शरीराचे प्रदूषण आणि जंतूंपासून संरक्षण करतात.

कसे खावे: तुम्ही ही फळे सॅलड म्हणून खाऊ शकता किंवा त्यांचा जूस देखील बनवू शकता.

५. मूग डाळ: हिवाळ्यात हलका आणि उबदार आहार घेणे आवश्यक आहे आणि मूग डाळ हा एक उत्तम पर्याय आहे. पचण्यास सोपे, त्यात प्रथिने, फायबर आणि खनिजे भरपूर असतात. ते शरीराला ऊर्जा प्रदान करते, हिवाळ्यात अशक्तपणा टाळते. मूग डाळ खाणे हाडांच्या आरोग्यासाठी देखील फायदेशीर आहे, कारण त्यात कॅल्शियमचा चांगला स्रोत असतो. कसे खावे: तुम्ही ताजी मूग डाळ किंवा खिचडी खाऊ शकता, जे हिवाळ्यात गरम आणि हलके जेवण असते.हिवाळ्यात या ५ गोष्टींचे सेवन करून तुम्ही तुमच्या आरोग्याची काळजी तर घेऊ शकताच, शिवाय तुमच्या शरीराला आवश्यक असलेली उष्णता आणि पोषण देखील देऊ शकता.

# “ए” या जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे डोळ्यांत चिकट पदार्थ जमा होतो



सकाळ झाल्यावर डोळ्यांच्या कोपऱ्यात हलकासा कचरा (मळ किंवा चिकट पदार्थ) दिसणे ही एक सामान्य बाब आहे. या माध्यमातून डोळे स्वतःची स्वच्छता नैसर्गिकरीत्या करत असतात; पण काही लोक तक्रार करतात की, त्यांच्या डोळ्यांतून सारखा पिवळा किंवा पांढरा, चिकट स्राव बाहेर पडत असतो.

यासंदर्भात अमेरिकन डॉक्टर एरिक बर्ग स्पष्ट करतात की, डोळ्यांत सतत चिकट पदार्थ जमा होण्याचे एक मुख्य कारण व्हिटॅमिन ङ्गएफ्फची कमतरता असू शकते. जेव्हा शरीरात व्हिटॅमिन “ए” कमी होते, तेव्हा डोळे कोरडे पडू लागतात. कोरडेपणा वाढू नये म्हणून डोळे स्वतःच्या संरक्षणासाठी जाड म्यूकस तयार करतात. हाच म्यूकस रात्रभर जमा होऊन चिकट पदार्थाचे रूप घेतो. यामुळे डोळ्यांत खाज सुटणे किंवा गंभीर परिस्थितीत अंधुक दिसणे अशा समस्या वाढू शकतात. ज्या लोकांना आयर्नची कमतरता आहे, पित्ताशयाचे किंवा यकृताचे विकार आहेत, तसेच अपचन अशा समस्यांनी त्रस्त आहेत, त्यांच्यात व्हिटॅमिन “ए” ची कमतरता अधिक दिसून येते. व्हिटॅमिन “ए” यकृतामध्ये साठवले जाते.

याव्यतिरिक्त, जे लोक अल्कोहोलचे (मद्य) जास्त सेवन करतात त्यांनाही डोळ्यांचा त्रास होऊ शकतो. अंड्याचा पिवळा भाग, दूध आणि तूप, गाजर, रताळे हे सर्व पदार्थ व्हिटॅमिन “ए” चे उत्तम स्रोत आहेत. याचबरोबर डोळ्यांच्या समस्यांसाठी तज्ज्ञ डॉक्टरांकडून उपचार घेणे आवश्यक आहे.

# २१ नोव्हेंबर महाराष्ट्र हुतात्मा स्मृतिदिन

महाराष्ट्रातील शेकडो लोकांनी आपले रक्त सांडून आजच्याच दिवशी १९५६ साली महाराष्ट्र स्वतंत्र केला. संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी १०६ हुतात्म्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. आज या हुतात्म्यांना वंदन करण्याचा दिवस. त्यांच्या कार्या विषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. हुतात्म्यांच्या बलिदानामुळे आणि त्यांनी केलेल्या त्यागामुळे तत्कालीन सरकारला संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीपुढे झुकावे लागले. या हुतात्म्यांनी दिलेल्या बलिदानानंतर सरकारला अखेर मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना करावी लागले. २१ नोव्हेंबर १९५६ ला फ्लोरा फाऊंटनच्या परिसरात तणावाचे वातावरण होते. राज्य पुनर्रचना आयोगाने महाराष्ट्राला मुंबई देण्याचे नाकारले होते. या निर्णया मुळे मराठी माणूस पेटून उठला होता. सर्वत्र छोट्या मोठ्या सभांमधून सरकारच्या निर्णयाचा निषेध केला जात होता. कामगारांचा एक विशाल मोर्चा सरकारचा निषेध करण्यासाठी फ्लोरा फाऊंटन समोरील चौका कडे कूच करत होता. प्रचंड जनसमुदाय एका बाजुने चर्चगेट स्थानकाकडून व दुसऱ्या बाजुने बोरीबंदरकडून गगनभेदी घोषणा देत फ्लोरा फाऊंटनकडे निघाला. या मोर्चाला उधळून लावण्यासाठी पोलिसांनी आंदोलकांवर लाठीचार्ज केला. मात्र, अढळ सत्याग्रहींपुढे पोलिसांचे हे प्रयत्न अयशस्वी झाले. मुंबई राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी पोलिसांना गोळीबाराचे आदेश दिले. या गोळीबारात तीनशेहून अधिक आंदोलक जखमी झाले. १०६ जणांनी आपला प्राण गमवला. त्यानंतर या हुतात्म्यांच्या बलिदानामुळे व मराठी माणसाच्या आंदोलनामुळे सरकारने नमते घेत १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना केली. त्यानंतर १९६५ मध्ये फ्लोरा फाऊंटन येथे हुतात्मा स्मारकाची उभारणी करण्यात आली. संयुक्त महाराष्ट्र साठी ज्या १०६ हुतात्म्यांनी आपल्या प्राणाची पर्वा न करता बलिदान केले त्या सर्वांना विनम्र अभिवादन.

## अल्झायमर समजून घेताना... डॉक्टर टीप्स

**अल्झायमर प्रतिबंध**

- आहारात फळे, भाजीपाला, मासे यांचे योग्य प्रमाण असल्यास काही प्रमाणात आजाराला प्रतिबंध होतो. ङ- मधुमेह, अतिरक्तदाब, रक्तात कोलेस्टेरॉलचे जास्त प्रमाण, धूम्रपान हे सर्व या आजाराची शक्यता वाढवतात.- मेंदूला चेतना देणारे खेळ, संगीत, सामाजिक कार्यक्रमात सहभाग, द्विभाषिक व्यवहार आदीमुळे आजाराला प्रतिबंध होतो.- रंगात वापरली जाणारी सॉल्वंट रसायनेही या आजाराला निमंत्रण देतात असे दिसते.



**अल्झायमरग्रस्तांना समजून घेताना...**

- या आजारावर निश्चित वैद्यकीय औषधे अद्याप नाहीत. काही औषधांचा वापर केला जातो, पण उपयोग मर्यादित आहे. याशिवाय अधिक संशोधन सुरू आहे.
- घरातील इतर व्यक्तींवर या आजारी माणसाची विशेष जबाबदारी येऊन पडते, त्यांनी संवेदनेने या रुग्णांना समजून घ्यायला हवे.- सुरक्षितता : आजुबाजूची खोली, वस्तू, व्यवहार सुरक्षित होतील अशी काळजी घ्यायला हवी.

## विनोद




गिऱ्हाईक : मी एक चूक केली.
वेटर : काय झाले साहेब?
गिऱ्हाईक : तुला 'टिप' द्यायच्याऐवजी मी ती तुझ्या मालकाला दिली.
वेटर : मोठीच चूक झाली साहेब. आता ती मला कधीही मिळणार नाही.

## संदेश

Movie titles related to engg students:
exams – socha na tha,
classes – kabhi kabhi,
question papers – na tum jano na hum,
copying – yaarana,
maths2 – asambhav,
maths1 – mission impossible,
environmental sciences – pyar mein kabhi kabhi,
1st semester – kuch to hai,
2nd semester – yeh kya ho raha hai,
distinction – kal ho na ho,
1st class – raju bangaya gentleman,
2nd class – dil mange more
fail – phir milenge

## सुविचार

राग जाळा नाही तर तो तुम्हाला जाळेल.
**– अज्ञात**




**संस्कृत सुभाषित**

**न स्वप्नेन जयेन्निद्रां, न कामेन जयेत् स्त्रियम।**
**नेन्धनेन जयेदग्नि, न पानेन जयेत् सुरा ॥**

**अर्थ –** अतिनिद्रेची इच्छा बाळगून निद्रेवर विजय मिळवता येत नाही. स्त्रीची कामवासना कामोपभोगाने शमत नाही, उलट ती वाढते, अग्नीत जळण घातल्याने तो जास्त भडकतो. अतिमद्यपानाची आसक्ती धरून मद्यपानाची इच्छा शमत नाही, उलट ती भडकते. भोगाचा अतिरेक केल्याने भोगाची इच्छा वाढतच जाते.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

२. रावण
५. सामाजिक नातेसंबंध
९. आश्रय
१२. चुकीचा अर्थ लावणे, गैरअर्थ
१३. वस्ती
१४. ग्रामीण बोलीत पुष्कळ, चिक्कार
१६. नंतर
१७. द्युतात हरल्यामुळे पांडवांना झालेली शिक्षा
२०. रम्य
२१. दाटी
२२. सुदैवी
२३. पुत्र
२५. नूतन
२६. भाकरीबरोबरचे लोकप्रिय कालवण
२८. भातलावणीसाठी तयार केलेले खड्डे
२९. वस्त्र
३३. रस्ता
३४. जनानखाना
३६. श्रावणात याची सार्वधिक पूजा होते
३७. क्रोध
३९. गाढव
४१. व्यापारी
४३. प्रजा
४५. पराभव
४६. खोटा, कृत्रिम
४८. सुखद गार
४९. निष्णात
५०. श्रीरामाची पत्नी
५१. गुंड
५२. खोट्याचा डाव
५२अ.प्रयत्न
५४. आयुर्वेदिक केशतेलातली एक वनस्पती
५६. बेडूक
५८. दीप
५९. तमाशा
६१. पायपीट
६२. हल्ली
६३. पुष्पपराग
६५. चपखल प्रत्युत्तर देणारा
६७. वेतन
६९. श्रीमंत
७०. गाठोडे
७३. तांबडा
७४. देऊळ
७५. अविवाहित पुरुष
७७. ख्रिस्ती प्रार्थनास्थान
७८. समशेर
७९. विलंब
८०. टोमणा

## उभे शब्द

१. सूर्य
२. खलाशी
३. शिक्षा
४. काम होण्यासाठी देवाशी करार
५. सोशिक
६. मारला गेलेला
७. नवरामुलगा
८. गाव
१०. प्रसंगावधान
११. संताप
१५. भागाबाईला नाचवणारे वाद्य
१८. शिवभक्तांचे मुख्य तीर्थस्थान, बनारस
१९. सुगंध
२१. तंबोऱ्याचे वेष्टन
२४. होडी
२५. दसऱ्याआधीचा उत्सव
२७. विहीर
३०. भ्रतार
३१. अनुभव, प्रचीती
३२. धाक
३३. उत्सवाचा दिवस
३५. पतीचे घर
३७. अरिष्ट
३८. कुशल
४०. घाबरलेला
४२. जादूगाराची पिशवी
४४. सुरुवात
४५. वस्त्र विणण्याचे साधन
४६. वेलींचा मांडव
४७. हात राखून खर्च करणे
४८. ईदचे मिष्टान्न
५२. नेहरूंचे नाव
५३. अकबराच्या दरबारातील नऊ कर्तबगार
५५. बंदुकीची गोळी
५७. नेत्रांजन
६०. सळई
६१. ताकीद
६४. पाण्यातील सजीव
६६. पुन्हा पुन्हा
६८. वाहन
७०. पत्नी
७१. असंमती
७२. उपासना
७४. देशातच तयार झालेले
७६. भस्म

## आडवे उत्तर

२.दशानन ५.सहजीवन ९.आसरा १२.विपर्यास १३.वसाहत १४.रगड १६.मग १७.वनवास २०.रमणीय २१.गर्दी २२.नशीबवान २३.सूत २५.नव २६.झुणका २८.खाचर २९.वसन ३३.सडक ३४.राणीवसा ३६.सत्यनारायण ३७.संताप ३९.रासभ ४१.वाणी ४३.रयत ४५.हार ४६.लटका ४८.शीतल ४९.पारंगत ५०.सीता ५१.टग्या ५२.रडी ५२अ.जतन ५४.माका ५६.मंडूक ५८.दिवा ५९.वग ६१.तंगडतोड ६२.सध्या ६३.रज ६५.हजरजवाबी ६७.पगार ६९.मालदार ७०.बासन ७३.लाल ७४.देवालय ७५.कारा ७७.चर्च ७८.करवाल ७९.उशीर ८०.कोपरखळी

## उभे उत्तर

१.सविता २.दर्यावर्दी ३.शासन ४.नवस ५.सहनशील ६.हत ७.वर ८.नगर १०.समयसूचकता ११.राग १५.डमरु १८.वाराणसी १९.सुवास २१.गवसणी २४.तर २५.नवरात्र २७.आड ३०.नवरा ३१.प्रत्यय ३२.दरारा ३३.सणवार ३५.सासर ३७.संकट ३८.पटू ४०.भयभीत ४२.पोतडी ४४.आरंभ ४५.हातमाग ४६.लतामंडप ४७.काटकसर ४८.शीरकुरमा ५२.जवाहरलाल ५३.नवरत्ने ५५.काडतूस ५७.सुरमा ६०.गज ६१.तंबी ६४.जलचर ६६.वारंवार ६८.गाडी ७०.बायको ७१.नकार ७२.अर्चना ७४.देशी ७६.राख



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### सर्वात मोठी कसोटी मालिका होणार सुरु; सामना पाहण्यासाठी उठावे लागणार कडाक्याच्या थंडीत!

पर्थ–जगातील सर्वात मोठी कसोटी मालिका, अ‍ॅशेस आता काही तासांवर आली आहे. ही ऐतिहासिक मालिका ऑस्ट्रेलियामध्ये होत आहे. या मालिकेत एकूण पाच कसोटी सामने खेळले जातील, जे जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचा भाग आहेत. दरम्यान, या मालिकेबद्दल भारतात प्रचंड उत्साह आहे.पहिला अ‍ॅशेस कसोटी सामना २१ नोव्हेंबरपासून : ऑस्ट्रेलियातील अ‍ॅशेस मालिकेचा पहिला सामना २१ नोव्हेंबरपासून पर्थ स्टेडियमवर खेळला जाईल. यासाठी तयारी पूर्ण झाली आहे. ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडनं आधीच त्यांच्या प्लेइंग इलेव्हनची घोषणा केली आहे, जरी शेवटच्या क्षणी बदल शक्य आहेत. अ‍ॅशेस मालिका ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमध्ये खेळली जात असली तरी, त्यामुळं संपूर्ण क्रिकेट जगतात उत्साह निर्माण होतो. ही मालिका दोन्ही देशांसाठी प्रतिष्ठेची आहे. ऑस्ट्रेलियन आणि इंग्लिश क्रिकेट संघ कोणताही सामना गमावू शकतात, परंतु अ‍ॅशेस गमावणं त्यांच्यासाठी अत्यंत अपमानजनक मानलं जातं.

### हरभजन सिंगच्या कृतीमुळे भारत-पाकमध्ये पेटला नवा वाद

मुंबई–भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांमध्ये सध्या तणावाचं वातावरण आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय संघाने आशिया चषक स्पर्धेत पाकिस्तानसोबत खेळण्यास नकार दिला होता. पण नियमानुसार भारतीय संघाला पाकिस्तानसोबत खेळावं लागलं. भारतीय खेळाडू खेळण्यासाठी मैदानात उतरले, पण खेळाडूंनी पाकिस्तानच्या खेळाडूंसोबत हस्तांदोलन करणं टाळलं होतं. पहिल्या सामन्यापासून ते शेवटच्या सामन्यापर्यंत भारतीय खेळाडू हस्तांदोलन करताच मैदान सोडून बाहेर गेले होते. हे क्रिकेटसह फुटबॉल आणि कबड्डीतही भारतीय खेळाडूंनी ही भूमिका घेतली. दरम्यान हरभजन सिंगचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतोय, ज्यात तो पाकिस्तानच्या खेळाडूंसोबत हस्तांदोलन करताना दिसून येत आहे.सध्या अबू धाबी टी–१० लीग स्पर्धेचा थरार सुरू आहे. या स्पर्धेत भारताचा माजी क्रिकेटपटू हरभजन सिंग एस्पिन स्टॅलियन्स संघाचं नेतृत्व करत आहे. या स्पर्धे त सामना झाल्यानंतर हरभजन सिंग पाकिस्तानचा गोलंदाज शाहनवाज दहानीसोबत हस्तांदोलन करताना दिसून आला आहे.

### पहिल्या सामन्यासाठी ऑस्ट्रेलियाची प्लेईंग ११ जाहीर! १४ वर्षानंतर...

नवी दिल्ली–ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये होणारी आणि मानाची समजली जाणारी अ‍ॅशेस मालिका २१ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. दोन्ही संघांसाठी ही मालिका जिंकणं वर्ल्डकप जिंकण्यापेक्षा कमी नसतं. यावेळी इंग्लंडचा संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असणार आहे. मालिकेतील पहिला कसोटी सामना पर्थच्या मैदानाव खेळवला जाणार आहे. पर्थ कसोटी सुरू होण्याच्या एक दिवसाआधीच ऑस्ट्रेलियाने आपली प्लेईंग ११ जाहीर केली आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियाची जबाबदारी स्टीव्ह स्मिथकडे सोपवण्यात आली आहे.ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स अजूनही दुखापतीतून पूर्णपणे सावरलेला नाही. त्यामुळे पहिल्या कसोटीसाठी स्टीव्ह स्मिथची कर्णधार म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून २ खेळाडूंना पदार्पण करण्याची संधी दिली जाणार आहे. ब्रेंडन डोगेट आणि जेक वेदराल्ड हे दोन्ही खेळाडू आपला पहिलाच कसोटी सामना खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहेत.

### गंभीरला सेफ केले, पहिल्या टेस्टच्या पराभवाला जबाबदार कोण?

मुंबई–कोलकत्ताच्या ईडन गार्डनच्या मैदानावर साऊथ आफ्रिकेने टीम इंडियाचा अवघ्या ३० धावांनी लाजिरवाणा पराभव केला होता.या पराभवानंतर आता गौतम गंभीर आणि त्याच्या रणनितीवरून चौफेर टीका सूरू आहे. ही टीका सूरू असतानाच भारताचा बॅटींग कोच सितांशु कोटक गंभीरच्या बचावासाठी पुढे आला आहे. सितांशू कोटक यांनी गंभीरची बाजू घेतली आहे. यासोबत कोलकत्ता टेस्टमधील भारताच्या लाजिरवाण्या पराभवाला कोण जबाबदार होता? यावर देखील त्यांनी सगळंच सांगून टाकले आहे.गुवाहाटीत रंगणाऱ्या दुर्सया टेस्टआधी भारताचे बॅटींग कोच सितांशू कोटक यांची पत्रकार परिषद पार पडली आहे. या पत्रकार परिषदेत सितांशु कोटक यांनी गंभीर होणाऱ्या टीकेनंतर त्यांचा बचाव केला आहे. ''मला एक गोष्ट जाणवली आहे की लोक फक्त गौतम गंभीर, गौतम गंभीर, गौतम गंभीर म्हणत आहेत. कोणीही म्हणत नाही की या फलंदाजाने हे केले, या गोलंदाजाने ते केले, किंवा मी फलंदाजी प्रशिक्षक म्हणून काहीतरी वेगळे करू शकतो,'' असे कोटक यांनी सांगितले.

### ऑस्ट्रेलिया इंग्लंड कसोटी मालिकेला ॲहशी का म्हणतात? वृत्तपत्रातील 'तो' एक लेख ठरला कारणीभूत

दिल्ली–इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील प्रतिष्ठित अ‍ॅशेस कसोटी मालिकेला सुरूवात होत आहे. ही मालिका उद्या म्हणजेच २१ नोव्हेंबरपासून पर्थमधील पर्थ स्टेडियममध्ये खेळवली जाणार आहे. इंग्लंड व ऑस्ट्रेलिया संघांतील हे द्वंद्व फार पूर्वीपासून चालत आहे. या दोन्ही संघांमधील या मालिकेला अ‍ॅशेस असं नाव देण्यात आलं. इंग्लंडमध्ये झालेल्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाने पहिल्यांदाच इंग्लंडला पराभूत केल्यानंतर अ‍ॅशेस हा शब्द वापरण्यात आला होता. पण हे नाव का, कसं पडलं, जाणून घेऊया. ऊॅशेस मालिका २०२५–२६ ऑस्ट्रेलियात खेळवली जाणार आहे. पण पहिल्याच सामन्यासाठी ऑस्ट्रेलियाचा वर्ल्ड चॅम्पियन कर्णधार पॅट कमिन्स उपलब्ध असणार नाहीये. त्यामुळे संघाची कमान स्टीव्ह स्मिथच्या नावे आहे. तर इंग्लंड संघाचे नेतृत्त्व बेन स्टोक्स करणार आहे.इंग्लंडम ध्ये झालेल्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाने पहिल्यांदाच इंग्लंडला पराभूत केल्यानंतर अ‍ॅशेस हा शब्द वापरात आला.
१८८२ च्या मालिकेत इंग्लंड उत्कृष्ट

## रिंकू सिंहचे रेड बॉल क्रिकेटमध्ये ऐतिहासिक शतक



**२४८ चेंडूत १७ चौकार आणि ६ षटकारांच्या मदतीने १७६ धावांची खेळी**

कोयंबतूर : आयपीएल स्पर्धेत धमाकेदार कामगिरी करुन दाखवत अल्पावधित टी–२० मध्ये फिनिशरच्या रुपात नावारुपाला आलेला रिंकू सिंहने आता रेड बॉल क्रिकेटमधील धमाकेदार शतकी खेळीसह लक्षवेधून घेतलं आहे. रिंकू सध्या देशांतर्गत क्रिकेटमधील रणजी करंडक स्पर्धेत उत्तर प्रदेशच्या संघाकडून खेळताना दिसत आहे. या स्पर्धेतील ५ व्या फेरीत कोयंबतूरच्या मैदानात रंगलेल्या तमिळनाडू विरुद्धच्या सामन्यात रिंकूने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये कडक शतकी केली. तमिळनाडू विरुद्धच्या सामन्यात रिंकूने १५७ चेंडूत ९ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने दमदार खेळी करत टी–२० चा स्टार या टॅगसह कसोटीत धमक दाखवण्याची क्षमता असल्याचे दाखवून देणारी खेळी केली आहे.

यंदाच्या रणजी हंगामात त्याच्या बॅटमधून आलेली ही दुसरी शतकी खेळी आहे. याआधी त्याने आंध्र प्रदेशविरुद्धच्या सामन्यात १६५ धावांची खेळी केली होती. आता रिंकू सिंह याने २४८ चेंडूत १७ चौकार आणि ६ षटकारांच्या मदतीने १७६ धावांची खेळी साकारली. आंध्रविरुद्ध शतकी धमाका केल्यावर ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील टी–२० मालिकेमुळे तो काही रणजी सामन्याला मुकला. टी–२० मालिकेतही बहुतांश सामन्यात त्याला बाकावर बसावे लागले. शेवटच्या सामन्यात त्याला प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी मिळाली, पण पावसाच्या व्यत्ययामुळे शेवटचा सामना अनिर्णित राहिल्यामुळे त्याच्यावर बॅटिंगची वेळ आली नाही. आता रिंकू रणजीत धमाका करताना दिसतो.रिंकू सिंह याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये टी–२० पदार्पण केले आहे. पण कसोटीत अद्याप त्याला संधी मिळालेली नाही. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्याचा रेकॉर्ड एकदम झक्कास आहे. आतापर्यंत ५२ सामन्यातील ७४ डावात त्याने ५९ पेक्षा अधिकच्या सरासरीसह ३६३८ धावा केल्या आहेत. यात ९ शतके आणि २२ अर्धशतकांचा समावेश आहे. या सामन्यात तामिळनाडूच्या संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना बाबा इंद्रजीथ याने १८८ चेंडूत केलेल्या १४९ धावा आणि आंद्रे सिद्धार्थच्या २०५ चेंडूतील १२१ धावांच्या जोरावर ४५५ धावा केल्या. या दोघांशिवाय अजितेश गुरुस्वामी याने १५३ चेंडूत ८६ धावांची खेळी केली.



## १०० व्या कसोटीत १००! मुशफिकुर रहीमचा वर्ल्ड रेकॉर्ड

### मुशफिकूरने दिग्गजांच्या यादीत मिळवलं स्थान

**ढाका:** बांगलादेशचा अनुभवी फलंदाज मुशफिकुर रहीमने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे.
: बांगलादेशचा अनुभवी यष्टीरक्षक फलंदाज मुशफिकुर रहीम आपल्या कसोटी कारकिर्दीतील १०० वा कसोटी सामना खेळण्यासाठी मैदानात उतरला आहे. आयर्लंडविरूद्ध सुरू असलेल्या सामन्यात त्याने दमदार शतकी खेळी केली आहे. आपल्या कसोटी कारकिर्दीतील १०० व्या सामन्यात शतकी खेळी करताच मुशफिकुर रहीमच्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे. त्याने शतक झळकावताच असं काही करून दाखवलं आहे, जे विराट कोहली, सचिन तेंडुलकर आणि सुनील गावसकरसारख्या दिग्गजांनाही जमलेलं नाही.
कसोटी क्रिकेटमध्ये १०० कसोटी सामने खेळणाऱ्या खेळाडूंची यादी बरीच मोठी आहे. पण १०० व्या कसोटी सामन्यात शतकी खेळी करण्याचा पराक्रम मोजक्याच खेळाडूंना करता आला आहे. आता मुशफिकुर रहीमने या मोजक्यात खेळाडूंच्या यादीत स्थान पटकावलं आहे. आयर्लंडविरूद्ध शतकी खेळी करताच मुशफिकुर रहीम हा कसोटी क्रिकेटमध्ये १०० व्या सामन्यात शतकी खेळी करणारा जगातील ११ वा फलंदाज ठरला आहे. इंग्लंडचे माजी फलंदाज कॉलिन काऊड्रे



यांनी १९६८ मध्ये ऑस्ट्रेलियाविरूद्ध खेळताना १०० व्या सामन्यात पहिलं शतक झळकावलं होतं. तर ऑस्ट्रेलियाचा माजी फलंदाज रिकी पॉन्टिंगच्या नावे १०० व्या कसोटी सामन्यातील दोन्ही डावात शतक झळकावण्याचा विक्रम आहे. त्याने २००६ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरूद्ध खेळताना हा पराक्रम केला होता.

दुसऱ्या कसोटीतून बाहेर; 'या' खेळाडूकडे नेतृत्वाची जबाबदारी

भारताचा माजी फलंदाज सचिन तेंडुलकरच्या नावे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १०० शतकं झळकावण्याची नोंद आहे. सचिनने आपल्या कसोटी कारकिर्दीत २०० सामन्यांमध्ये भारतीय संघाचं प्रतिनिधित्व केलं. पण त्याला १०० व्या आणि २०० व्या कसोटीत देखील शतक झळकावता आलं नव्हतं. पण आता मुशफिकुर रहीमने हा मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे.

'२०११ चा वर्ल्ड कप सत्य साई बाबांमुळे जिंकू शकलो', सचिन तेंडुलकरनं जागवल्या आठवणी

या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशने १३३ षटकांचा खेळ होईपर्यंत ८ गडी बाद ४४३ धावा केल्या आहेत. बांगलादेशकडून फलंदाजी करताना मुशफिकुर रहीमने १०६ धावांची खेळी केली. तर यष्टीरक्षक फलंदाज लिटन दासने १२८ धावांची दमदार खेळी केली.

### १००व्या कसोटी सामन्यात शतकी खेळी! अशी कामगिरी करणारा जगातील ११वा खेळाडू



बांगलादेश क्रिकेट संघ आयर्लंडविरुद्ध घरच्या मैदानावर दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळत आहे, या मालिकेतील दुसरा सामना ढाका येथील शेर–ए–बांगला राष्ट्रीय स्टेडियमवर खेळला जात आहे. बांगलादेश क्रिकेटचा सर्वात अनुभवी खेळाडू आणि माजी कर्णधार मुशफिकुर रहीमसाठी ही कसोटी खास आहे, कारण तो त्याचा १०० वा कसोटी सामना खेळणार आहे. दुसऱ्या दिवशी खेळताना मुशफिकुरनं त्याचं १३ वं कसोटी शतक पूर्ण करुन त्याची १०० वी कसोटी आणखी खास बनवली. यासह, मुशफिकुर रहीम जागतिक क्रिकेटमध्ये पूर्वी फक्त १० खेळाडूंचा समावेश असलेल्या एलिट यादीत सामील झाला.

मुशफिकुर ठरला ११वा खेळाडू : कोणत्याही खेळाडूसाठी १०० कसोटी सामने खेळण्याचा प्रवास सोपा नाही आणि म्हणूनच, हा टप्पा गाठण्यात फार कमी खेळाडूंना यश आले आहे. मुशफिकुर रहीम हा १०० कसोटी सामने पूर्ण करणारा पहिला बांगलादेशी खेळाडू आहे. दुसऱ्या कसोटीच्या पहिल्या दिवसाच्या खेळाच्या शेवटी, रहीम ९९ धावांवर नाबाद होता. आयर्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीच्या दुसऱ्या दिवशी खेळ सुरु झाला तेव्हा, मुशफिकुर रहीमनं शतक पूर्ण केलं, तो १००व्या कसोटी सामन्यात हा पराक्रम करणारा जागतिक क्रिकेटमधील फक्त ११ वा खेळाडू ठरला. मुशफिकुर रहीमच्या आधी, कॉलिन काउड्रे, जावेद मियांदाद, गॉर्डन ग्रीनिज, ॲलेक स्टीवर्ट, इंझमाम–उल–हक, रिकी पॉन्टिंग, ग्रॅमी स्मिथ, हाशिम अमला, जो रुट आणि डेव्हिड वॉर्नर यांनी ही कामगिरी केली होती.

मुशफिकुर रहीम १०६ धावा करुन पॅव्हेलियनमध्ये : आयर्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीला शतकानं खास बनवणारा मुशफिकुर रहीम १०६ धावा करुन पॅव्हेलियनमध्ये परतला. रहीमला आयर्लंडचा डावखुरा फिरकी गोलंदाज मॅथ्यू हम्फ्रीजने बाद केले. बांगलादेशने कसोटी मालिकेत १–० अशी आघाडी घेतली आहे आणि दुसरा सामना जिंकून क्लीन स्वीप करण्याचे त्यांचे लक्ष्य आहे. पहिल्या सामन्यात बांगलादेशने आयर्लंडचा एक डाव आणि ४७ धावांनी पराभव केला.

## हार्दिक पांड्या आणि महिका शर्मा पुन्हा चर्चेत; व्हायरल फोटोंनी वाढवल्या अफवा

मुंबई–टीम इंडियाचा स्टार ऑलराउंडर हार्दिक पांड्या आणि अभिनेत्री महिका शर्मा सध्या सोशल मीडियावर चांगलेच चर्चेत आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांच्या अफेअरच्या चर्चा सुरू झाल्या, दोघांचे एकत्र फोटो व्हायरल होऊ लागले. हार्दिक आणि महिका एकत्र फिरताना दिसू लागल्यापासूनच चाहत्यांमध्ये त्यांच्या नात्यावरून संशय व्यक्त केला जात होता. यातच आता हार्दिकने आपल्या इन्स्टाग्रामवर 'बिग ३' नावाने तीन फोटो शेअर केले, ज्यात महिका, त्याचा मुलगा अगस्त्य आणि त्याचा पाळीव कुत्रा दिसत आहेत. या फोटोंमध्ये हार्दिक आणि महिका एकमेकांच्या जवळ दिसत असल्याने चाहत्यांचा गोंधळ आणखी वाढला आहे.

साखरपुड्याच्या चर्चांना उधाण

एका फोटोने तर साखरपुड्याच्या चर्चांना चांगलीच हवा दिली आहे. त्या फोटोमध्ये दोघे एकत्र प्रार्थना करताना दिसतात आणि महिकाच्या बोटातील रिंगने साऱ्यांचे लक्ष गेले.आणखी एका फोटोमध्ये हार्दिक महिकाच्या गालावर किस करताना दिसतोय, तर काही फोटोमध्ये हे कपल पारंपारिक पोशाखात पूजा करताना दिसले. मात्र दोघांनीही या अफवांवर अद्याप काही भाष्य केलेले नाही.

हार्दिक आणि महिकाची जवळीक कशी वाढली?नताशा स्टॅनकोविकपासून विभक्त झाल्यानंतर हार्दिक आणि महिकामधील जवळीक वाढू लागली. हार्दिक आणि नताशाचे लग्न तब्बल चार वर्ष टिकले असून दोघांना अगस्त्य नावाचा मुलगा आहे. पण त्यांनी २०२४ मध्ये त्यांनी दोघांच्या सहमतीने विभक्त होण्याचा निर्णय घेतला. घटस्फोटानंतर काही दिवस हार्दिकचे नाव अभिनेत्री जास्मिन वालियाशी जोडले गेले होते. मात्र त्या चर्चांना पूर्णविराम मिळाला जेव्हा हार्दिकने महिकाच्या वाढदिवशी तिच्यासोबतचे फोटो शेअर केले. यापूर्वीही हे जोडपे सुट्टीसाठी एकत्र गेलेले फोटो शेअर करून चर्चेत आले होते. ऑक्टोबर महिन्यात दोघे मुंबई विमानतळावर दिसले, तेव्हाच ते

## क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज सादर करावेत

**जालना–**क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, जालना मार्फत जिल्हयातील गुणवंत क्रीडापटू, गुणववंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचे योगदानाचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने शासनातर्फे जिल्हा क्रीडा पुरस्कार जिल्हयातील ०१ गुणवंत क्रीडा मार्गदर्शक, गुणवंत खेळाडू ( ०१ पुरूष, ०१ महिला व ०१ दिव्यांग खेळाडू ) असे एकुण ०४ पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत.

सन २०२४–२५ च्या जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी दि. १ जुलै २०२४ ते ३० जून २०२५ सदर कालावधीसाठी वर्षाच्या खेळाडूसाठी मागील पाच वर्षाची कामगिरी व क्रीडा मार्गदर्शकासाठी मागील दहा वर्षाची कामगिरी विचारात घेतली जाईल. गुणवंत खेळाडूने पुरस्कार वर्षासह लगतपुर्व पाच वर्षपैकी दोन वर्षे त्या जिल्ह्याचे मान्यता प्राप्त खेळाच्या अधिकृत स्पर्धेमध्ये प्रतिनिधीत्व केले असले पाहिजे.

## क्रिकेट इतिहासात मोठी कामगिरी करत अर्जुन तेंडुलकरचे १०० बळी

मुंबई : सचिन तेंडुलकर याचा मुलगा अर्जुन तेंडुलकर अनेकदा चर्चेत असतो. अर्जुन त्याच्या वडिलांमुळे नेहमीच चर्चेत येतो, पण क्रिकेटपटू म्हणून त्याला अद्याप म्हणावी तशी छाप पाडता आलेली नाही. आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्स संघाने गेल्या अनेक हंगामात अर्जुनला संघात सामील करून घेतले. पण त्याला अपेक्षित संधीच मिळाली नाही.
त्यामुळे अलिकडेच मुंबई इंडियन्सने त्याला लखनौ सुपर जायंट्सला स्वाधीन केले. लखनौ कडून अर्जुनला फक्त ५ सामने खेळता आले. तसेच, रणजी स्पर्धेतही अर्जुनला मुंबई संघातून अपेक्षित संधी न मिळाल्याने, तो गोवा संघाकडून खेळू लागला. तशातच आता अर्जुन तेंडुलकरने आता एक मोठी कामगिरी केली आहे. अर्जुन तेंडुलकर सध्या रणजी चषकामध्ये खेळत आहे. तो गोव्याकडून देशांतर्गत क्रिकेट खेळतो.



सौराष्ट्रविरुद्धच्या रणजी ट्रॉफीमध्ये त्याने वरिष्ठ क्रिकेट मोठा टप्पा गाठला. अर्जुनने हार्विक देसाईची बळी घेऊन त्याच्या कारकिर्दीतील १००वा बळी टिपला. अर्जुनने २०२१ मध्ये मुंबईकडून हरयाणाविरुद्धच्या पदार्पणाच्या सामन्यात वरिष्ठ क्रिकेटमधील पहिला बळी घेतला होता. त्यानंतर आतापर्यंत त्याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ४८, लिस्ट ए क्रिकेटमध्ये २५ आणि टी२० मध्ये २७ बळी घेतले.अर्जुन २०२२–२०२३च्या स्थानिक हंगामापूर्वी मुंबईत संधींचा अभाव असल्याने गोव्यात गेला होता. २०२२ मध्ये त्याने राजस्तानविरुद्ध गोव्याकडून रणजी ट्रॉफीमध्ये पदार्पण केले. त्याच्या पहिल्या रणजी ट्रॉफी सामन्यात अर्जुनने शतक ठोकले होते. २६ वर्षीय अर्जुनला खेळाडूला २०२१ मध्ये मुंबई इंडियन्सने ३० लाख रुपयांना विकत घेतले. त्यानंतर त्याने २०२३ मध्ये त्याने आयपीएलमध्ये पदार्पण केले. अर्जुनला २०२३ मध्ये ४ आणि २०२४ मध्ये फक्त १ सामना खेळायला मिळाला. आयपीएलमध्ये त्याच्या नावे केवळ ३ विकेट्स आहेत. त्यानंतर यंदा तो लखनौच्या संघात सामील झाला.

## सौ संगीता ताई सोमनाथ गुरव यांचा मशाल चिन्हावर निवडणुकीत उदय

### जनतेसाठी २४ तास सेवा देण्याच्या आश्वासन

**धाराशिव/प्रतिनिधी :** पंधरा वर्षापासून सक्रिय राजकारणातील अनुभवी आणि खासदार ओमराजे निंबाळकर व आमदार कैलास दादा पाटील यांच्यासोबत काम करत असलेली सोमनाथ गुरव हे उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे गटनेते नगरपालिकेतील आहेत तरी त्यांच्या पत्नी सौ संगीताताई सोमनाथ गुरव या मशाल चिन्हावर नगर परिषदेच्या निवडणुकीत अध्यक्षपदासाठी उभा आहेत तरी सोमनाथ गुरव यांनी नेहमीच जनतेसाठी २४ तास खुले राहून काम केले आहे नगरपालिकेत विविध विकास कामांमध्ये सक्रिय सहभाग घेतलेला हा अनुभव आजचा पुढील कार्यकाळात नागरिकाच्या हितासाठी पूर्णपणे वापरण्याचे त्यांचे ठाम आश्वासन आहे उमेदवारी जाहीर करताना त्यांनी म्हटले की नगरपालिकेतील प्रत्येक विभागात विकास कामे स्वच्छता सार्वजनिक आरोग्य पायभूत सुविधा आणि नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवणे ही त्यांची प्राथमिकता असेल तसेच पारदर्शक प्रशासन आणि प्रत्येक नागरिकापर्यंत न्याय सेवा पोहोचवणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे सोमनाथ गुरव यांच्या नेतृत्वाखालील मशाल गटाचे उद्दिष्ट नगरपालिकेत सकारात्मक बदल घडवून आणणे प्रत्येक नागरिकाच्या जीवनमानात सुधारणा करणे आणि प्रत्येक समस्या जनतेच्या दृष्टीने सोडवणे यावेळी स्थानिक नागरिकांनी सांगितले की सोमनाथ गुरव हे नेहमीच आपल्यासाठी कार्यरत राहिले आहेत आत्ता निवडणुकीत संधी मिळाल्यामुळे शहरात विकास आणि सुव्यवस्था निश्चित दिसेल असे त्यांचे ठाम आश्वासन आहे तरी नागरिकांनी ह्या गोष्टी विचारात घ्याव्या



## श्री गणेश शिक्षण संस्था, शिवांश कौशल्य विकास संस्थेच्या आयुष योग निसर्गोपचार चिकित्सालयाचे उद्घाटन

**लातूर/प्रतिनिधी :** शहरातील श्री गणेश शिक्षण संस्था व शिवांश कौशल्य विकास संस्थेच्या आयुष योग निसर्गोपचार चिकित्सालयाचे योगाचार्य विष्णूजी भुतडा यांच्या हस्ते मंगळवारी (ता. १८) फित कापून उद्घाटन झाले.

खाडगाव रोड भागातील मुक्तिग्राम व्यसनमुक्ती केंद्राच्या परिसरात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगमहर्षी रमाकांत विष्णुपंत शास्त्री होते. डॉ. जगन्नाथ येरोळकर, डॉ. मालती कानडे, डॉ. शिवराज निलंगेकर, डॉ. विकास भिकाजीराव निलंगेकर, डॉ. रामचंद्र संग्रामजी गरड (आर्य), डॉ. स्मिता फडणीस, योगप्रशिक्षक दीपक गटागट, शिवराज फफागिरे, अशोक महाराज बिरारी, विवेकानंद चामले, सीए आनंद बारपुते, अड. विजय सलगरे, श्री गणेश शिक्षण संस्थेचे संस्थापक भागवत बदामे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

योगाचार्य भुतडा यांनी जिवनात निरोगी राहण्यासाठी योग व दिनचर्ये चे महत्व सांगितले. आयुर्वेद व निसर्गोपचार हाच सुखी जिवनाचा मूलमंत्र असल्याने युवक व प्रत्येक व्यक्तीसह सर्वांनी योगसाधना करावी, असे आवाहन श्री. भुतडा यांनी केले. जीवन हे अनमोल आहे. प्रत्येकाने व्यनांपासून दूर राहावे. योग साधना व साधी जीवनशैली अंगिकारून निसर्गोपचार चिकित्सेद्वारे निरोगी व संपन्न जीवन जगावे, असे मत योगमहर्षि शास्त्री यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी आयुष योग निसर्गोपचार चिकित्सालयात उपलब्ध सुविधा व निरोगी समाज घडविण्याचा संस्थेचा उद्देश असल्याचे संयोजकांनी सांगितले. प्रमुख पाहुण्यांनी उपस्थितांना योग व निसर्गोपचार चिकित्सेसंदर्भात मार्गदर्शन केले.

श्री गणेश शिक्षण संस्थेच्या सचिव निर्मला बदामे, निखिल बदामे, बालाजी नादरगे, सागर मलवाडे, प्रेमिला सूर्यवंशी, शंकर शिंदे, विष्णू कांबळे, संजय शिंदे, तन्मय नलवाडे यांनी या कार्यक्रमासाठी पुढाकार

# अहमदपुर नगर परिषदेची निवडणुक संपूर्ण ताकदीने लढून जिंकणार

### शहराध्यक्ष अमित रेड्डी यांची हकालपट्टी – माजी मंत्री भाजपाचे जिल्हा अध्यक्ष बसवराज पाटील

**अहमदपूर/प्रतिनिधी** :अहमदपूर दि.(प्रतिनिधी) अहमदपूर नगर परिषदेची निवडणूक भाजप स्वबळावर संपूर्ण ताकतीने लढून जिंकणार असल्याचे मत माजी मंत्री तथा भारतीय जनता पक्षाचे जिल्हा अध्यक्ष बसवराज पाटील यांनी निर्धार व्यक्त करून भाजपाचे अहमदपूर शहराध्यक्ष अमित रेड्डी यांची पक्षातून हकालपट्टी केल्याचे जिल्हा अध्यक्ष बसवराज पाटील यांनी जाहीर केले.



शहरातील सानवी मंगल कार्यालयात अहमदपूर नगर परिषद निवडणुक संदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. पुढे बोलताना जिल्हा अध्यक्ष म्हणाले की या नगर परिषद निवडणुकीत भाजप ला विश्वासात घेऊन सन्मानपूर्वक जागा देतील ही अपेक्षा होती. आम्ही शेवट पर्यंत आशावादी होतो. महायुतीचा धर्म पाळणार होतोत. अनेक त्या संदर्भात बैठका सुद्धा झाल्या परंतु त्यांनी अकेला चलोरे चा नारा अचानक पणे चालु केल्यामुळे भाजपाला स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घ्यावा लागला . शहराध्यक्षानी अचानक पक्षाला धोका दिल्यामुळे पाच सहा ठिकाणी आम्हाला उमेदवार देता आले नाही. याचा बदला आम्ही नक्कीच घेणार असुन केंद्रात भाजपा राज्यात भाजपाचे सरकार असून विकासाच्या मुद्दावरच आम्ही संपूर्ण ताकतीने निवडणूक लढून जिंकणार असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री तथा भारतीय जनता पक्षाचे जिल्हा अध्यक्ष बसवराज पाटील यांनी केले आहे. यावेळी माजी पालकमंत्री आ. संभाजी भैय्या पाटील निलंगेकर, आ. रमेश अप्पा कराड, आ. अभिमन्यू पवार, माजी आमदार गोविंद अण्णा केंद्रे, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख,गणेश दादा हाके पाटील, माजी नगराध्यक्ष ॲड.भारत चामे, माजी सभापती अशोक काका केंद्रे, त्रंबक आबा गुट्टे,राजकुमार मजगे, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार ॲड. स्वप्निल व्हते,ग्रामीणचे अध्यक्ष प्रताप पाटील यांनी मनोगत व्यक्त करुन अहमदपूर नगर परिषदेवर भारतीय जनता पक्षाचा झेंडा फडकवणार असल्याचे सांगितले. यावेळीभाजपाचे गोविंद गिरी यांनी बैठकीचे प्रास्ताविक करून आभार मानले. यावेळी नगर परिषद प्रभारी बसवराज पाटील कौळखेडकर, विक्रम काका शिंदे,जिवणकुमार मद्देवाड,माजी नगराध्यक्ष संगमेश्वर ठेसे, बसवराज धाराशिवे,वसंत डिगोळे, सज्जन लोणाळे,चंद्रप्रकाश हंगे ,ओम पुणे,चंदशेखर डांगे,मणिषा नवने आदिसह भाजपाचे असंख्य पदाधिकारी,नगर सेवक पदाचे सर्व उमेदवार कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बारावीनंतर आवड, क्षमता आणि ध्येय जाणूनच करिअरची निवड करा

### प्रा. तेजस कराड यांचे आवाहन; लातूर एमआयटीत करिअर मार्गदर्शन मेळावा संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** २१ व्या शतकाच्या नॉलेज इकॉनॉमीमध्ये एकाच पदवीवर करिअर उभे राहण्याचे दिवस संपले असून सतत शिकणे, कौशल्यवृद्धी आणि स्वतःला अपडेट ठेवणे अत्यावश्यक झाले आहे. विद्यार्थ्यांनी बारावीनंतर आपल्या आवडी, क्षमता आणि भविष्यातील ध्येय लक्षात घेऊन योग्य करिअरची निवड करावी, असे आवाहन माईर एमआयटी लातूरचे संचालक प्रा. तेजस हनुमंत कराड यांनी केले.

येथील माईर एमआयटी, लातूरच्या करिअर गाईडन्स सेलतर्फे आयोजित करिअर मार्गदर्शन मेळाव्यात प्रा. तेजस कराड प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या वेळी एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. यतिश कुमार जोशी, एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, ऑप्टोमेट्री महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी श्री. शंकर ससाने, तसेच प्रयाग कराड कॉलेज ऑफ नर्सिंगच्या श्रीमती आशा फुंदे उपस्थित होत्या.

यावेळी पुढे बोलताना प्रा. तेजस कराड यांनी तैत्तिरीय उपनिषदातील 'स्वाध्यायान्मा प्रमदः' या वचनाचा उल्लेख करत स्व-अभ्यास आणि सतत शिकण्याच्या संस्काराचे महत्त्व अधोरेखित केले. आजची शिक्षणपद्धती गुणांपुरती मर्यादित झाल्याचे सांगत त्यांनी शिक्षकांना प्रश्न केला, आपण विद्यार्थ्यांना शिकवतोय की फक्त गुण मिळवायला तयार करत आहोत? विद्यार्थ्यांनी घोकंपट्टी टाळून व्याख्यात्मक विचार, भावनिक बुद्धिमत्ता आणि सामाजिक कौशल्ये आत्मसात करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.



बारावीनंतर विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी केवळ एमबीबीएस किंवा इंजिनिअरिंगपुरत्याच मर्यादित न ठेवता उदयोन्मुख क्षेत्रांची माहिती देणे ही पालक व शिक्षकांची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. वैद्यकीय आणि आरोग्य क्षेत्रात जागतिक स्तरावर कौशल्यपूर्ण मनुष्यबळाची वाढती मागणी असल्याचे सांगत त्यांनी दंत चिकित्सा, नर्सिंग, फिजिओथेरपी, ऑप्टोमेट्री, हॉस्पिटल मॅनेजमेंट, क्लिनिकल रिसर्च यांसारख्या शिक्षणातील करिअर संधींकडे लक्ष वेधले वेधले.

अनेक विद्यार्थ्यांना मी कोण? मला काय जमतं? आणि मी हे का करतोय? यांची स्पष्टता नसल्याने त्यांच्यातील तणाव आणि असंतोष वाढतो. विद्यार्थ्यांना स्वतः चा मार्ग शोधण्यास सक्षम करणे ही सर्वांची सामाईक जबाबदारी आहे. कौशल्याधारित शिक्षण, आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम, एआय आणि डिजिटल साक्षरता या नव्या युगातील आवश्यक गरजा असल्याचे प्रा. कराड यांनी सांगितले.

यावेळी बोलताना डॉ. यतिश कुमार जोशी यांनी दंत वैद्यकीय शिक्षण, संशोधन आणि रुग्णोपचारातील वाढत्या संधींबद्दल सविस्तर माहिती दिली. डॉ. सुभाष खत्री यांनी फिजिओथेरपी क्षेत्रातील शिक्षण, उपचारातील उपयोगिता व करिअरच्या व्यापक संधींची माहिती दिली. एमआयटी करिअर गाईडन्स सेल प्रमुख श्री. बळीराम हांडगे यांनी वैद्यकीय व पॅरामेडिकल क्षेत्रामधील विविध करिअर पर्याया बाबत सखोल माहिती दिली.

श्रीमती आशा फुंदे यांनी नर्सिंग क्षेत्रातील जागतिक मागणी, नोकरीच्या संधी यावर प्रकाश टाकला. श्री. शंकर ससाने यांनी ऑप्टोमेट्रीमधील शिक्षण, नोकरी आणि स्वतंत्र व्यवसायाच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. मानसोपचार तज्ज्ञ श्री. संदेश नागरगोजे यांनी विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, ताण-तणाव व्यवस्थापन आणि योग्य मनःस्थिति राखण्याचे गुपित सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परमेश्वर सोनवणे यांनी केले, तर आभार श्रीमती राधा चाटे यांनी मानले. लातूर जिल्ह्यातील सुमारे ६० महाविद्यालयांमधील प्राचार्य व प्राध्यापकांनी या मेळाव्यास उत्स्फूर्तपणे उपस्थिती लावली. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी हनुमंत नलवाडे, वर्षा ढाकणे, धनंजय कुलर्णी, गोविंद फड, नय्युम शेख, नामदेव घोडके, बालासाहेब सरवदे व कृष्णा केंद्रे यांनी परिश्रम घेतले.

## प्रत्येकाने आपले नेते व पदाधिकारी सांभाळावेत; अमित शहांची एकनाथ शिंदे यांना सूचना

**मुंबई/प्रतिनिधी :** भाजपकडे बोट दाखविण्यापेक्षा शिवसेनेने आपले नेते व पदाधिकारी सांभाळावेत, ते अन्य पक्षात जाणार नाहीत, याची काळजी घ्यावी, अशी सूचना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केल्याचे सूत्रांनी सांगितले. महायुतीतील मतभेदांवर चर्चा व समन्वयातून मार्ग काढावा, मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार टाकून जाहीरपणे नाराजीचे प्रदर्शन न करण्याची सूचनाही शहांनी शिंदे यांना केली.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना कल्याण-डोंबिवलीतील शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) पदाधिकारी पैशांचे आमिष दाखवून फोडल्याची शिंदे यांची तक्रार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाठिंब्याने या बाबी होत असून मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार घालूनही फडणवीस यांनी शिंदेंची फारशी दखल घेतली नाही. त्यामुळे शिंदे यांनी शहा यांची बुधवारी रात्री नवी दिल्लीत भेट घेवून तीव्र नाराजी व्यक्त केली.

सरकारमध्ये सहभागी असूनही भाजप मित्रपक्षातच फोडाफोडी करीत असल्याचा मुद्दा शिंदे यांनी उपस्थित केला. मात्र शिवसेनेत (उद्धव ठाकरे) नाराज असल्याने शिंदे पक्षातून बाहेर पडले व भाजपने त्यांना मदत केली. आपल्या पक्षातील नेते व पदाधिकाऱ्यांना, कार्यकर्त्यांना सांभाळण्याची जबाबदारी प्रत्येक पक्षाची आहे.


**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SOMWANSHI BALIRAM DYANANOBA** TO: **BALIRAM DYANANOBA SOMVANSHI**
Hence for this Declaration i will be known by this name and will use SOMWANSHI BALIRAM DYANANOBA in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **SOMWANSHI BALIRAM DYANANOBA**
NEW NAME :- **BALIRAM DYANANOBA SOMVANSHI**
Address - At Post Jalkot Taluka Tuljapur DIST. Dharashiv. -413602
Adhar n.-322289664140 Mob.9067111992

**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SHAIKH SADIQ AHMED** TO: **SADEK AHEMAD PATEL**
Hence for this Declaration i will be known by this name and will use SHAIKH SADIQ AHMED in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **SHAIKH SADIQ AHMED**
NEW NAME :- **SADEK AHEMAD PATEL**
Address - Kazi Patta Sultanpura Osmanabad
DIST. Osmanabad. -413501
Adhar n.-337328175077 Mob.8208194006

**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SADIKH AHMED SHAIKH** TO: **SADEK AHEMAD PATEL**
Hence for this Declaration i will be known by this name and will use SADIQ AHMED SHAIKH in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **SADIKH AHMED SHAIKH**
NEW NAME :- **SADEK AHEMAD PATEL**
Address - Kazi Patta Sultanpura Osmanabad
DIST. Osmanabad. -413501
Adhar n.-337328175077 Mob.8208194006

**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **MUJAWAR AASEFKHA GALEFKHA.** TO **ASIFKHA GALIFKHA MUJAWAR.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the ASIFKHA GALIFKHA MUJAWAR will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **MUJAWAR AASEFKHA GALEFKHA.**
NEW NAME:- **ASIFKHA GALIFKHA MUJAWAR.**
Address :- SHIVAJI NAGAR. WASHI,TA.WASHI,
DIST. OSMANABAD -413503
AADHAR NO.- 726633222090 Mob. No.-9421306786


# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात दोन दिवसीय संशोधन कार्यशाळा संपन्न!

**नाशिक/प्रतिनिधी :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र आणि ज्ञानस्त्रोत केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने "Research Visibility, Ethical Publishing and Use of AI Tools in Research" (संशोधन दृश्यमानता, नैतिक प्रकाशन आणि संशोधनात ए. आय. साधनांचा वापर) या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर दिनांक १९ आणि २० नोव्हेंबर २०२५ रोजी दोन दिवसीय कार्यशाळा यशस्वीरित्या संपन्न झाली. राज्यभरातील ९१ संशोधक विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सक्रिय सहभाग घेतला.



विद्यापीठाच्या यश इन सभागृहात झालेल्या कार्यशाळा समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते. व्यासपीठावर कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक व केंद्रीय विद्यापीठ, हरियाणाचे ग्रंथपाल प्रा. संतोष सी. एच, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्या तथा प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्राच्या प्रमुख प्रा. डॉ. संजीवनी महाले, विद्यापीठ ज्ञानस्तोत्र केंद्राचे प्रमुख डॉ. प्रकाश बर्वे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलतांना मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी संशोधन लिखाणात संशोधकाने नैतिकता तर पाळलीच पाहिजे परंतु त्यात त्याचा स्वत:चा एक वेगळा बाणा दिसला पाहिजे. त्यात लिहिलेल्या प्रत्येक शब्दाचे न्याय स्पष्टीकरण त्यास देता आले पाहिजे. एआय आणि तंत्रज्ञानाच्या या युगात बाह्यप्रेरणेपेक्षा स्वयंप्रेरणेने काम करत संशोधकाने आपल्या संशोधनातील ज्ञान कालबाह्य होण्याच्या आत संशोधन कार्य लवकरात लवकर पूर्ण करावे असे आवाहन देखील त्यांनी शेवटी केले.

विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केंद्रातील संगणक प्रयोगशाळेत सहभागी संशोधकांना सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक ज्ञान देण्यात आले. त्यात प्रामुख्याने प्रभावी ऑनलाईन शोध तंत्र आणि धोरणे, संशोधन आणि प्रकाशन कार्यांसाठी साधने आणि मुक्त प्रवेश संसाधने, नीती, नियम आणि साधनांच्या संदर्भात साहित्यिक चोरी टाळणे, प्रीडेटरी नियतकालिकांची ओळख: उपयुक्त साधने, मानके आणि तंत्रे, उद्धरण मेट्रिक्स: इम्पॅक्ट फॅक्टर, १० इंडेक्स, २० इंडेक्स, अल्टमेट्रिक्स या विषयांवर प्रात्यक्षिक आधारित व्याख्यान देण्यात आले. या सत्रांसोबतच उपयुक्त सूचना, चर्चा आणि कार्यशाळेनंतरचे असाइनमेंट्स यावरही मार्गदर्शन करण्यात आले. समारोपप्रसंगी सहभागी संशोधकांना प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. डॉ. भागवत कराडकर, श्री. संदीप किजवे व श्रीमती शुभांगी पाटील या सहभागी संशोधकांनी कार्यशाळेबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. वसुदेव राउत यांनी सूत्रसंचलन व आभारप्रदर्शन केले.


**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,धाराशिव**

**ई-निविदा सुचना क्र.०८**
**सन २०२५/२६**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव (दूरध्वनी क्र. ०२४७२-२२२८८२/८३) हे ब-१ योग्य त्या कंत्राटदार यांचेकडून २ (दोन) कामासाठी ऑनलाईन निविदा मागवित आहेत.

वेबसाईट:-http://mahatenders.gov.in
व https://pwd.maharashtra.gov.in

स्वाक्षरीत/-
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग,
धाराशिव.


**लातूर शहर महानगरपालिका, लातूर**

मुख्य कार्यालय-मेन रोड, लातूर
**बांधकाम विभाग**

दूरध्वनी: ०२३८२-२४२८०३/२४६०७५ ई-मेल:mclaturgmail.com

जा.क्र.लामनपा/बांध./९१०९/२०२५ दिनांक : २०/११/२०२५

**जाहीर प्रगटन**

ज्याअर्थी खराब रस्ते व रस्त्यावरील खड्डे यामुळे होणारे अपघात व मृत्यू याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र.७१/२०१३ ची सुनावणी दि.१३/१०/२०२५ रोजी संपन्न झाली असून सदर सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाने आदेश पारित केले आहेत. त्यानुसार लातूर महानगरपालिका क्षेत्रात रस्त्यांवरील खड्डयाबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर कार्यवाही तसेच खड्ड्यामुळे मृत्यूमुखी अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने समितीची स्थापना करणेबाबत निर्देश दिले आहेत.

त्यानुसार लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील महानगरपालिकेच्या मालकीचे व अखत्यारीत रस्त्यावरील खड्ड्यामुळे मृत्यूमुखी अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने जनहित याचिका क्र.७१/२०१३ च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १. | आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर | अध्यक्ष |
| २. | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर | सदस्य |
| ३. | उपायुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर | सदस्य |
| ४. | शहर अभियंता (सा.बां.), लातूर शहर महानगरपालिका, लातूर | सचिव |
| ५. | कार्यकारी अभियंता (पा. पु.), लातूर शहर महानगरपालिका, लातूर | सदस्य |
| ६. | पोलीस निरीक्षक वाहतूक नियंत्रण शाखा, लातूर | सदस्य |
| ७. | पोलीस निरीक्षक (महानगरपालिका हद्दीतील संबंधित पोलीस ठाणे) | सदस्य |
| ८. | मुख्य स्वच्छता अधिकारी, लातूर शहर महानगरपालिका, लातूर | सदस्य |
| ९. | शाखा अभियंता (सा. बां.), लातूर शहर महानगरपालिका, लातूर | सदस्य |

तरी लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील मालकीचे व अखत्यारीत रस्त्यावरील खड्ड्यांबाबत लातूर शहर महानगरपालिका मुख्य कार्यालय तसेच mclatur.org या वेबसाईट वर तक्रार दाखल करता येईल (लेखी किंवा Online स्वरुपात).

स्वाक्षरीत
**उपायुक्त,**
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

# काम, विकास आणि विचाराला मत द्या : माजीमंत्री बसवराज पाटील

## भाजप-शिवसेना-रिपाई युतीचा कार्यकर्ता मेळावा आणि शुभारंभ सभा

**औसा/प्रतिनिधी :** भाजप-शिवसेना-रिपाई युतीचा भव्य कार्यकर्ता मेळावा आणि शुभारंभ सभा २० नोव्हेंबर रोजी औसा येथे उत्साहात आणि शक्तिप्रदर्शनाच्या वातावरणात पार पडली. तीन प्रमुख नेत्यांनी-माजी मंत्री बसवराज पाटील, आमदार संभाजी पाटील निलंगेकर आणि आमदार अभिमन्यू पवार-युतीची विकासनिष्ठ भूमिका स्पष्टपणे मांडत औसाच्या नागरिकांना विकासाच्या मुद्द्यावर मतदान करण्याचे आवाहन केले.



सभेचे अध्यक्ष बसवराज पाटील म्हणाले, औसा बदलण्यासाठी आम्ही व्यापक पातळीवर काम केले आहे. आम्हाला आमच्या कामाला, विकासाला आणि विचाराला मत द्या. जात-धर्माच्या पलीकडे जाऊन विकासाचे राजकारण करणारी ही युती आहे. पाटील यांनी सांगितले की, सामाजिक समतोल राखत उमेदवारी दिली असून खऱ्या अर्थाने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनाच संधी देण्याचा प्रयत्न झाला आहे. औसेकर विकासाला मत देणारे आहेत आणि संधी आमच्याकडेच येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.यावेळी मंचावर आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजी माने,नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ ज्योती महादेव बनसुडे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी सरकारी योजना सर्व समाजघटकांसाठी समानपणे दिल्याचे सांगत विकास हेच मुख्य ध्येय असल्याचे स्पष्ट केले. लाडकी बहीण आणि आरोग्य योजना एका जात-धर्मापुरत्या नाहीत. आम्ही टीम भाजप म्हणून एका दिशेने काम करतो आहोत. ही निवडणूक कार्यकर्त्यांची आहे आणि कार्यकर्त्यांना पदावर बसवण्यासाठी आम्ही पूर्ण ताकद लावत आहोत, असे ते म्हणाले. त्यांनी अभिमन्यू पवार यांच्या शेत रस्त्यांसारख्या आदर्श विकासकामांचा विशेष उल्लेख केला.

सभेत आमदार अभिमन्यू पवार यांनीही दमदार भाषण करत विरोधकांवर निशाणा साधला. जिल्ह्यात भाजपचे वातावरण आहे. सबका साथ, सबका विकास या ब्रीदवाक्यावर आम्ही निवडणुकीला सामोरे जात आहोत. औसा शहरासाठी तब्बल ५०० कोटींचा निधी उपलब्ध करून विकासकामांची मालिका उभी केली आहे, असे ते म्हणाले उपजिल्हा रुग्णालय, पाणीपुरवठा योजना, रस्ते विकास, नवीन बसस्थानक यांसारखी कामे जलद गतीने पूर्ण झाल्याची माहिती त्यांनी दिली.

नगरपालिकेने काही विकासकामांसाठी आवश्यक प्रमाणपत्र न दिल्याचा आरोप करत पवार म्हणाले, हीच ती वेळ आहे विकासाच्या आड येणाऱ्यांना घरी बसवा. उमेदवारी न मिळालेल्या कार्यकर्त्यांनी घरी न बसता पक्षाच्या विजयासाठी कामाला लागावे, असे आवाहनही यावेळी त्यांनी केले.एकूणच, औसाच्या राजकीय वातावरणात युतीने विकास हा मुख्य मुद्दा ठरवत निवडणुकीची दिशा स्पष्ट केल्याचे या मेळाव्यातून दिसून आले. या मेळाव्याचे प्रास्ताविक माजी नगराध्यक्ष किरण उडगे यांनी केले तर सूत्रसंचालन भाजपाचे मंडळाध्यक्ष शिव मुरगे यांनी केले कार्यक्रमाचे आभार चंद्रशेखर सोनवणे यांनी मांडले.

## वारकरी संप्रदायात मीपणा, अहंकाराला कदापि थारा नाही-शरद बिराजदार महाराज

उमरगा(प्रतिनिधी)- वारकरी संप्रदायात मी पणा आणि अहंकाराला कोणत्याही प्रकारचा थारा नसल्याने भेदाभेद अमान्य आहे. वारकरी आणि वारकरी यांच्यात खूप मोठा फरक असून वारकऱ्यांच्या सहवासात भक्तांच्या रांगा असल्याने देवत्व प्राप्त होण्यास उशीर होतो. नित्यनेमाने पंढरपूरची वारी आणि सोबत तुकोबाची गाथा ज्यांच्याकडे आहे तोच खरा वारकरी स्वरूपात वारकऱ्यांची मीमांसा शरद बिराजदार महाराज यांनी केली.

तालुक्यातील डोंगरगाव येथील हनुमान मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यात बुधवारी (दि.१९) काल्याच्या कीर्तनसेवेत बिराजदार महाराज बोलत होते. अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा १३ ते १९ नोव्हेंबर दरम्यान साजरा झाला. या अखंड हरिनाम सप्ताह आणि ज्ञानेश्वरी पारायण यंदाचे २९ वे वर्ष दररोज पहाटे काकडा आरती, विष्णू सहस्त्रनाम,ज्ञानेश्वरी पारायण,गाथा भजन प्रवचन, हरिपाठ, कीर्तन, हरीजागर धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. रात्री नऊ ते ११ तुकाराम हजारे महाराज, श्री कुलदीप महाराज, संजय महाराज अनसरवाडा, महंत तेजशनाथ महाराज कराळी, प्रशांत महाराज बलसूर, वैभव महाराज कानेगाव यांचे कीर्तनसेवा झाली. बुधवारी काल्याच्या कीर्तननंतर महाप्रसादाचे वाटपा होऊन अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याची सांगता झाली. या सप्ताह सोहळ्यात तोरंबा, आईपाटी, बोरी, नाईचाकूर. कोळेवाडी, आनंदवाडी, मुदगडवाडी, हालशी, शिवणीवाडी, डोंगरगाव माळेगाव, नारंगवाडी, कोराळी कोळीवाडी. रामलिंग मुदगड, कराडी सालेगाव, रामतिर्थ (क), कोराळी, भगतवाडी, दगडवाडी, बलसूर आदीसह परिसरातील भक्त भाविक सहभागी झाले होते. मानवाने जीवनात सत्य कर्म करून पावित्र्य राखावे शरद महाराजांचे काल्याच्या कीर्तनात म्हणाले, जिवंतपणी जो गळ्यात तुळशीची माळ घालून नेमस्त राहतो त्याच्या अंतरंगात व बाह्यअंगात ऊर्जा निर्माण होऊन तो पवित्र होतो. मृत्यूनंतर नेमस्त वारकऱ्याचे गळ्यात तुळशीची माळ फक्त देव काढतो तर गळ्यात माळ धारण करून दारू, मांसाहार, जुगार, वेशागमनसारखे कुकर्म करणाऱ्याच्या गळ्यातील माळ यमाला काढावी लागते. मानवाने जीवनात सत्यकर्म करून पावित्र्य राखावे.

## रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

परंडा (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे: लक्ष्मण रामदास थिटे, वय ४१ वर्षे, रा. खानापूर ता. परंडा जि. धाराशिव,महादेव सौदागर आडेकर, वय ५५ वर्षे, रा. साडे ता. करमाळा जि. सोलापूर यांनी दि.१९.११.२०२५ रोजी आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे चार चाकी गाडी क्र एमएच १४ सीपी१८९१ व चारचाकी गाडी क्र एमएच ४५ एएफ ८७१२ हे आयसीआयसी आय बॅकेचे समोर परंडा बार्शी रोडवर परंडा येथेचौघरी शक्ती स्टिल दुकानासमोर परंडा रोडवर परंडा येथे सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना परंडा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये परंडा पो.ठा. येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत. भुम पोलीस ठाणेअंतर्गत रोहीत समाधान वीर, रा. इंदीरानगर भुम ता. भुम. जि. धाराशिव, इम्रान मेहबुब बेग मोगल, वय ३७ वर्षे, रा. मोगलवाडा भुम ता. भुम जि. धाराशिव यांनी दि.१९.११.२०२५ रोजी आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे पे रिक्षा क्र , स्विफट व सुझुकी इको गाडी हे गोलाई चौक भुम व फलोरा चौक भुम येथे सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना भुम पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये भुम पो.ठा. येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

## २८ ग्रॅमचे गंठण अंदाजे १,४०,००० किंमतीचे चोरले

तुळजापूर्री पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी फुलावती शंकर राठोड, वय ५५ वर्षे, रा. श्रीनाथमंगल कार्यालय जवळ नळदुर्ग रोड तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव या दि.१८.११.२०२५ रोजी जुने बसस्थानक तुळजापूर येथे बस मधून उतरत असताना अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून फुलावती राठोड यांचे गळ्यातील सोन्याचे २८ ग्रॅमचे गंठण अंदाजे १,४०,००० किंमतीचे चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी ुलावती राठोड यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## पदवीधर मतदार नोंदणीसाठी सुधारित कार्यक्रम जाहीर

धाराशिव (जिमाका)- उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ च्या पत्रानुसार पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणीसाठी नमुना-१८ च्या अर्जावर कार्यवाही करण्यासाठी तारीख वाढविण्यात आली असून सुधारित कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. सुधारित कार्यक्रमानुसार : हस्तलिखीते तयार करणे व प्रारूप मतदार याद्यांची छपाई - २८/११/२०२५,प्रारूप मतदार याद्यांची प्रसिद्धी - ०३/१२/२०२५,दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी - ०३/१२/२०२५ ते १८/१२/२०२५,दावे व हरकती निकाली काढणे,पुरवणी यादी तयार करणे व छपाई - ०५/०१/२०२६, मतदार याद्यांची अंतिम प्रसिद्धी - १२/०१/२०२६ असा आहे. वरीलप्रमाणे सुधारित तारखा जाहीर करण्यात आल्या असून संबंधितांनी नमुना-१८ अर्ज,दावे व हरकती यांसंदर्भात दिलेल्या वेळापत्रकानुसार आवश्यक कार्यवाही करावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

## वाशीमध्ये महा ई-सेवा केंद्रांच्या कमतरतेमुळे गैरसोय

### महिला, शेतकरी ई-केवायसी करण्यासाठी तासन् तास बसतात थांबून

वाशी तालुक्यात मोजक्याच आधार व महा ई सेवा केंद्रांना मंजुरी असल्याने नागरिकांची मोठी फजिती होऊन आर्थिक पिळवणूक होत आहे. राज्य सरकार असो की केंद्र सरकार यांच्या कडून नागरिकांसाठी राबविण्यात आलेल्या प्रत्येक योजनेसाठी आधारकार्ड बंधनकारक करण्यात आलेले आहे. महावितरण कडून राबविण्यात येणारी सौर पंप योजना,कृषी विभागाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध शेती साहित्य, बी बियाणे,बँकेचे पीककर्ज,विद्यार्थ्यांचे विविध परीक्षांचे फॉर्म, महसूल कडून काढण्यात येणारे प्रत्येक प्रमाणपत्र, आरोग्य विभागाच्या उपचारकामी, घरकुल योजना या सह अनेक गरजेची कागदोपत्री कामे व शासकीय योजना या आधारकार्ड आधारे वितरित करण्यात येतात. ज्यामुळे आधारकार्ड हे महत्वाचे झाले आहे. आधारकार्ड मध्ये काही चूक असल्यास ती दुरुस्त केल्याशिवाय कोणत्याच योजनेचा लाभ मिळत नाही. यामुळे जन्मलेले बाळ असो की वयस्कर नागरीक आधार केंद्र आणि त्यांचे नाते कायम झाले आहे. दिवसेंदिवस सरकार करत असलेली आधाराची सक्ती यामुळे शहरात असलेल्या आधारकेंद्रात सकाळी ८ वाजलेपासून गर्दी असते. केंद्र १० वाजता सुरू होत असतानाही सर्व कामे सोडून नागरिकांना केंद्राच्या बाहेर सकाळपासून पहारा द्यावा लागतो. सध्या तर लाडकी बहीण योजनेसाठी ईकेवायसी करण्यासाठी महिलांची मोठी गर्दी आहे. केंद्र कमतरतेमुळे गैरसोय होत आहे.

शहरात डाक कार्यालय आणि अंगणवाडी मधील दोन अशा केवळ दोनच केंद्रावर संपूर्ण भार आहे. दिवसभरात केवळ प्रत्येकी केंद्रावर जास्तीत जास्त ५० नागरिकांचे कामे होऊ शकतात. यामुळे आज केंद्रावर नंबर लावल्यानंतर ते दोन दिवसांनी येत आहे. त्यात संकेतस्थळावर काही अडचण झाल्यास आणखीन भर पडत आहे.

## लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त सरदार १५० अभियान

धाराशिव (जिमाका) -लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त 'सरदार १५०' अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यामध्ये मेरा युवा भारत (युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय,भारत सरकार) यांच्यामार्फत २०२५ वर्ष हे भारताचे लोहपुरुष आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रमुख शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती वर्ष म्हणून साजरे केले जात आहे.या ऐतिहासिक प्रसंगाचे औचित्य साधून राष्ट्रीय एकता दिनानिमित्त ३१ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान संपूर्ण भारतभर जिल्हास्तरीय पदयात्रा आयोजित केल्या जाणार आहेत. या पदयात्रा प्रत्येक जिल्ह्यात आयोजित होणार असून त्यासोबत स्वच्छता मोहीम, व्यसनमुक्ती मोहीम,सरदार पटेल यांच्या विचारांवरील चर्चासत्रे,वादविवाद स्पर्धा इत्यादी कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.या उपक्रमात जिल्हा प्रशासन,माय भारत,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, शाळा,महाविद्यालये,स्थानिक युवा संघटना,छडड, छउउ स्वयंसेवक आणि भारत स्काऊट- गाईड युनिट्स यांची सक्रिय सहभागिता असेल. त्यानंतर जिल्ह्यातील निवडक तरुण १० दिवसांच्या 'सरदार १५० युनिटी मार्च' राष्ट्रीय पदयात्रेत सामील होतील. ही पदयात्रा संविधान दिनी (२६ नोव्हेंबर २०२५) सरदार पटेल यांच्या जन्मस्थळ करमसद येथून सुरु होऊन ६ डिसेंबर २०२५ रोजी 'स्टॅच्यू ऑफ युनिटी',एकता नगर येथे १५० किमी प्रवासानंतर समाप्त होईल. धाराशिव संस्थीय कार्यक्षेत्रामध्ये जिल्हास्तरीय युनिटी मार्च/पदयात्रा आयोजित केल्या जाणार आहेत.धाराशिव येथे पहिली जिल्हास्तरीय युनिटी मार्च/पदयात्रा दिनांक २१ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम येथून सुरू होईल. पदयात्रेचा मार्ग - जिल्हाधिकारी कार्यालय - पोलिस अधीक्षक कार्यालय - कोहिनूर हॉटेल - समतानगर - सह्याद्री चौक - महात्मा फुले चौक - श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम येथे समारोप. हा कार्यक्रम आणि उपक्रम माय भारत पोर्टलवर नोंदणीसाठी उपलब्ध आहेत. जिल्ह्यातील नागरिकांनी या ऐतिहासिक उपक्रमात नोंदणी करून सक्रिय सहभाग नोंदवावा,असे आवाहन करण्यात येत आहे.

## खेडमध्ये तुरीचा तिफन प्रयोग यशस्वी, एकरी १२ क्विंटल उत्पादन अपेक्षित

लोहारा(प्रतिनिधी)-लोहारा तालुक्यातील खेड येथील प्रगतशील शेतकरी काकासाहेब अण्णाराव पाटील यांनी कृषी विभागाच्या योग्य मार्गदर्शनाखाली आपल्या केवळ ५० आर क्षेत्रावर तुरीच्या पिकाचा यशस्वी प्रयोग केला आहे. सध्या हे पीक उत्तम बहरले असून यातून त्यांना एकरी १० ते १२ क्विंटल विक्रमी उत्पादन अपेक्षित आहे.

काकासाहेब पाटील यांच्या शेतातील हा प्रयोग पाहण्यासाठी तालुक्यातील अनेक शेतकरी आवर्जून भेट देत असून, कृषी विभागाच्या योग्य नियोजनामुळे हे यश मिळाल्याचे शेतकरी पाटील यांनी सांगितले. शेतकरी काकासाहेब पाटील यांनी ५ जून रोजी आपल्या स्वतःच्या बैलावरील 'तिफन' (पारंपरिक पेरणी साधन) वापरून तुरीची पेरणी केली. यासाठी गोदावरी २०१३-४१ या कंपनीच्या पांढऱ्या जातीची तूर बियाण्याचा वापर केला. पेरणीपूर्वी बियाण्यांवर आवश्यक बीजप्रक्रिया करण्यात आली. यासाठी दोन ओळींतील अंतर ६ ते ७ फूट इतके ठेवण्यात आले आहे. आतापर्यंत दोन वेळेस फवारणी आणि एकदा पाटाने पाणी देण्यात आले आहे. सध्या तुरीच्या शेंगा चांगल्या बहरल्या असून, प्रत्येक शेंगामध्ये बियांची संख्या साधारणपणे ४ आहे. या प्रभावी शेंगदाण्यामुळे उत्पादनात लक्षणीय वाढ होण्याचा आणि एकरी १० ते १२ क्विंटल उत्पादन मिळण्याचा अंदाज आहे.

काकासाहेब पाटील यांना या बियाणे लागवडीसाठी सहायक कृषी अधिकारी नीलकंठ पाटील यांनी प्रोत्साहित केले. त्यांनी वेळोवेळी फवारणीसह योग्य नियोजनाबद्दल मार्गदर्शन केले. या यशस्वी प्लॉटची पाहणी मंडळ कृषी अधिकारी माळकुंजे साहेब यांनीही केली आणि समाधान व्यक्त केले.

## मोटरसायकलची चोरी : गुन्हा दाखल

धाराशिव(प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अभिजीत पांडुरंग बोधनले, वय ३८ वर्षे, रा.बालाजी नगर धाराशिव ता. जि. धाराशिव यांची अंदाजे २०,००० किंमतीची हिरो कंपनीची मोटरसायकल स्प्लेंडर ही दि.०९.११.२०२५ रोजी २३.३० ते दि.१०.११.२०२५ रोजी ०६.३० वा. सु. अभिजीत बोधनले यांचे राहते घरासमोर अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी अभिजीत बोधनले यांनी दि.१९.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## रिफ्लेक्टर, रेडियमसह पडदे न लावता धोकादायक ट्रॅक्टरमधून ऊस वाहतूक

उमरगा(प्रतिनिधी)- सर्वत्र साखर कारखान्यांचा गळित हंगाम सुरू असल्याने अनेक भागातील वाहने क्षमतेपेक्षा अधिक प्रमाणात ऊसाची वाहतूक होतानाचे चित्र दिसून येत आहे. कारखान्याकडे जाणाऱ्या सर्व मार्गांवर ट्रॅक्टरला अनधिकृतपणे दुसरी ट्रॉली लावून क्षमतेहून अधिक उसाची वाहतूक सर्रासपणे केली जात आहे. रात्रीच्या वेळी उसाची होणारी वाहतूक अपघाताला आमंत्रण देणारे असून, संबंधित विभागाने यावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

तालुक्यात मंगळवारी (१८) रात्रीच्या सुमारास लातूर-कलबुर्गी मार्गावर नारंगवाडीची वाडी या पाटीवर उसाची वाहतूक करणारा ट्रॅक्टर उभा असल्याचे अंधारात दिसून न आल्याने अपघात होऊन दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. ऊस वाहतुकीसाठी प्रामुख्याने ट्रक व ट्रॅक्टर्सना प्राधान्य देण्यात येते. वाहन-चालकांची वाहतूक नियमाबाबत जनजागृती केली जात नाही. साखर प्रशासनाचा ट्रॅक्टर चालकांवर वचक नसल्याने असे बेफिकिरीने, बेकायदा ऊस वाहतूक केली जाते. ऊस वाहतूक करण्यास सर्रासपणे दोन ट्रॉलींचा वापर केला जातो. ट्रॉलीची क्षमता १४ टन इतकी असते. परंतु यात १८ ते २० टन ऊस भरण्यात येतो. सर्रासपणे विनापासिंग ट्रॉलींचा वापर करण्यात येतो. ऊसाची वाहतूक करणारे ट्रॅक्टर्स अपघातास प्रामुख्याने ट्रॉली कारणीभूत ठरतात. विविध भागात शेतातून ऊसाची वाहतूक सुरू असताना दोन ट्रॉली टॅक्टर, ऊसाचा ट्रक भरून सुसाट धावत असल्याने नागरिकांना अपघाता-सह अनेक समस्यांचा नाहक त्रास सहन करावा लागतोय. ऊस वाहतूक करताना वाहनांच्या क्षमतेपेक्षा जास्त ऊस भरलेला दिसतोय.तसेच ट्रॉलीवर सुरक्षिततेच्या इंडिकेटर नसल्याने बरेच अपघात घडत आहेत. यावर नियंत्रण मिळवले पाहिजे.

ट्रॅक्टरला स्वतंत्रपणे ट्रॉली जोडण्यात येते. इंडिकेटर आणि रिफ्लेक्टर ही वापरण्यात येत नाही. ट्रॅक्टरचालक हे एकाच हेडलाइटचा वापर केला जात असल्याने समोरून व मागून येणाऱ्या वाहनधारकाची फसगत होते. समोरून दुचाकी येत आहे, अशा अंदाजाने वाहने जातात.

ट्रॅक्टरजवळ आल्यावर वाहनचालकाच्या लक्षात येते. त्यामुळे समोरून येणारी दुचाकीसह वाहने ट्रॅक्टवर आदळण्याचे घटना घडत आहेत. यावर करावई होणे अपेक्षित आहे.

टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर धाराशिव (उस्मानाबाद) येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,DHARASHIV(Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649